रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक १०१ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in




रायगड, शनिवार, दि. ७ सप्टेंबर २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

**उद्या अंक नाही!**
गणेश चतुर्थीनिमित्त शनिवार, दि. ७ सप्टेंबर २०२४ रोजी कृषीवल कार्यालयाला सुट्टी असल्याने रविवार, दि. ८ सप्टेंबरचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची सर्व वाचक, वितरक, जाहिरातदार व हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.
- मुख्य संपादक




आजचा अग्रलेख
**गणरायाचे स्वागत**

## वेधक

### सुधीर चेरकरला पोलीस कोठडी


**अलिबाग :** रेवदंडा येथील प्राथमिक रुग्णालयात एका महिलेला मारहाण केल्याप्रकरणी वरंडेचे माजी सरपंच सुधीर चेरकर याला अखेर पोलिसांनी जेरबंद केले. त्याला शुक्रवारी दुपारी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. घरगुती वादावरून एका महिलेच्या पतीला मारहाण झाली होती. त्यामध्ये ते जखमी झाले होते. रेवदंडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये त्यांच्यावर उपचार सुरू होते. दरम्यान, सुधीर चेरकर यांनी रुग्णालयात जाऊन तेथील महिलेला अश्लील शिवीगाळी करत मारहाण केली होती. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पान २ वर

# सत्तेचा माज, बेरोजगारांचे हाल

■ आरडीसीसी बँक नोकरभरती प्रक्रियेला स्थगिती
■ आ. भरत गोगावलेंकडून सत्तेचा गैरवापर
■ रोजगारनिर्मिती थांबविल्याने तरुणांमध्ये संताप

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातच नाही तर संपूर्ण देशातील बेरोजगारीची स्थिती भीषण आहे. शिक्षण घेतले पण नोकरी नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मोलमजुरी करुन, प्रसंगी पोटाला चिमटा काढून पालकांनी शिक्षण दिले आणि सरकारने रोजगाराचे केवळ आश्वासन. याच बेरोजगारीच्या प्रश्नांची गांभीर्याने दखल घेत शेकापने हजारो तरुणांच्या हाताला काम दिले, संसार उभा केला. कोणतेही राजकारण न करता केवळ समाजहितासाठी, तरुणांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शेकाप काम करीत आहे. मात्र, केवळ विरोधी भावना ठेवून शिंदे सरकारचे आ. भरत गोगावले यांनी सत्तेचा गैरवापर करीत रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेतील नोकरभरती प्रक्रियेला विरोध केला आणि सत्तेच्या जोरावर नोकरभरतीला स्थगिती दिली.


महाराष्ट्र शासन

**विधानसभा निवडणुकीचे कारण**

### राजकीय आकसापोटी बेरोजगारांचा बळी

जिल्ह्यात अनेक तरुण उच्चशिक्षित असून, त्यांना नोकरीची गरज आहे. शासनाच्या अधिकृत एजन्सीद्वारे ऑनलाईन पद्धतीने आरडीसीसी बँकेची भरती होणार होती. या भरतीवर हरकत घेण्याचे काही कारण नव्हते. परंतु, राजकीय आकसापोटी, विरोधी भावनेतूनच चुकीची माहिती देऊन शासनाला स्थगितीचे आदेश काढण्यास भाग पाडले आहे. राजकीय आकसापोटी बेरोजगारांचा बळी जात आहे. शासनाने याकडे डोळसपणे पाहणे आवश्यक आहे. निवडणुकीच्या तारखा अद्याप जाहीर झाल्या नाहीत. तरीही ते कारण दाखवून भरतीला स्थगिती देणे चुकीचे आहे, असे मत शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी तीव्र शब्दात व्यक्त केले.

> “शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून जिल्ह्यात रोजगाराचे साधन खुले करण्याचा प्रयत्न केला आहे. अनेकांना रोजगार मिळवून देण्यामध्ये शेकापचा सिंहाचा वाटा राहिला आहे. जिल्हा बँकेच्या माध्यमातून तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली होती. मात्र, यामध्ये विरोधकांनी अडथळा निर्माण केल्यास कदापि सहन करणार नाही. शेकाप कायमच युवकांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील. बँकेची भरती स्थगित करीत बेरोजगांरांच्या घशातील घास काढण्याचे काम सत्ताधाऱ्यांनी केले आहे. घाणेरड्या पद्धतीने होत असलेल्या या राजकारणाचा तीव्र निषेध आहे.”
>
> – चित्रलेखा पाटील, शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख

सांगून तरुणांचा रोजगार हिरावून घेण्याचे काम या सरकारने केले आहे. त्यामुळे तरुणांमध्ये सरकारविरोधात नाराजी पसरली असून, तात्काळ ही स्थगिती हटविण्याची मागणी रायगड जिल्ह्यातील तरुणांनी केली आहे. अन्यथा आंदोलन करण्याचा इशाराही त्यांच्याकडून देण्यात आला आहे.

रायगड जिल्ह्यातील तरुण हा तंत्रज्ञानामध्ये प्रवीण असा आत्ममग्र, कुशल आहे. ज्याला पुरेशा शिक्षण आणि रोजगाराच्या संधी नाहीत. आजचे तरुण हे उद्याचे शिल्पकार आहेत, ही भावना ठेवून आज शेकापक्ष रोजगारनिर्मितीसाठी अहोरात्र काम करीत आहे.

आधी कोरोना, मग मराठा आरक्षणाचा प्रश्न, लोकसभा-विधानसभा निवडणुका, सरकारची अनिश्चितता, योजनांची खैरात, नैसर्गिक आपत्ती असा प्रवास करीत उमेद बाळगलेले युवक मनस्तापातून स्वत:लाच पान २ वर

# एक लाख गणेशमूर्तींची आज होणार प्रतिष्ठापना

**| अलिबाग | प्रतिनिधी |**



घरोघरी आनंद, चैतन्य आणि उत्साहाचा वर्षाव करणाऱ्या गणपती बाप्पांचे शनिवारी आगमन होणार आहे. संपूर्ण रायगडवासियांना आता गणरायाच्या आगमनाचे वेध लागले असून, ही उत्कंठा आता संपणार आहे. अवघ्या काही तासातच गणरायाचे घरोघरी आगमन होणार आहे. जिल्ह्यात एक लाख ३ हजार २९७ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना सात सप्टेंबरला सकाळपासून केली जाणार आहे. त्यामध्ये एक लाख तीन हजार २४ खासगी, तर २७३ गणेशोत्सव मंडळांमार्फत पान २ वर

# फडणवीसांवर अविश्‍वास?

## नितीन गडकरी यांच्याकडे विशेष जबाबदारी

**| मुंबई | प्रतिनिधी |**



राज्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात लढविण्यात आलेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला जोरदार फटका सहन करावा लागला. भाजपाला मोठे यश मिळवून देण्यात देवेंद्र फडणवीस कमी पडल्याने केंद्रीय नेत्वृत्वाने राज्यात विधानसभा निवडणुकीत लोकसभेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रचार प्रमुख म्हणून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे विशेष जबाबदारी सोपवली आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीत भाजप प्रचारासाठी पान २ वर



## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**

**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**कै. प्रभावती महादेव पाटील स्मरणार्थ अलिबाग**



**दुर्वेश व गौरव घोसाळकर, वाढदिवस, गोंधळपाडा अलिबाग**

# चाकरमान्यांच्या दिमतीला लालपरी

**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**

**गणेशोत्सवामध्ये कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांची गैरसोय होऊ नये यासाठी रायगड जिल्ह्यातून सुमारे २१५ एसटी बसेस मुंबई, ठाण्यामध्ये मदतीला पाठविल्या जाणार आहेत.**

## रायगडमधून २१५ बसेस जाणार

## मुंबई, ठाण्यातील प्रवाशांच्या सेवेसाठी एसटी सज्ज



गणरायाचे आगमन येत्या ७ सप्टेंबरला होणार आहे. त्यासाठी अवघे काही तास शिल्लक राहिले आहेत. नोकरी-व्यवसायानिमित्त मुंबई व ठाण्यात राहणाऱ्या चाकरमान्यांची कोकणात जाण्याची लगबग सुरु झाली आहे. काही जण खासगी वाहनाने गेल्या आठ ते दहा दिवसांपूर्वीच कोकणात पोहोचले आहेत. विशेष म्हणजे, गणेशोत्सवात सुट्टी काढून गावी जाणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. काही चाकरमानी गावी कोकणात जाण्यास सुरुवात झाली आहे.

मुंबई, ठाण्यातून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांची गैरसोय होऊ नये यासाठी रायगडमधून ज्यादा बसेसची मागणी करण्यात आली आहे. जिल्ह्यातून २१५ बसेस पाठविल्या जाणार आहेत. बुधवारी (दि. ४), गुरुवारी (दि. ५) असे दोन दिवस १९१ बसेस पाठविल्या असून, २४ बसेस शुक्रवारी जाणार असल्याची माहिती रायगड विभाग नियंत्रक कार्यालयाकडून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील अनेक फेऱ्या रद्द केल्या आहेत. त्यामुळे गणेशोत्सवासाठी खरेदी करण्यासाठी स्थानिक बाजारात जाणाऱ्या प्रवाशांना त्याचा फटका बसत असल्याचे चित्र आहे. अलिबागसह अनेक बाजारात खरेदीसाठी सुरुवात झाली आहे. परंतु, एसटी बस फेऱ्या रद्द झाल्याने या प्रवाशांना अन्य वाहनांचा आधार घेत प्रवास करण्याची वेळ आली आहे.

### सहा ठिकाणी दुरुस्ती पथक

**मुंबईतून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुखकर व्हावा, एसटीचा बिघाड झाल्यास तातडीने त्याची दुरुस्ती व्हावी यासाठी एसटी महामंडळ रायगड विभागामार्फत जिल्ह्यात सहा ठिकाणी दुरुस्ती पथक नियुक्त केले आहे. खारपाडा, पेण, नागोठणे, कोलाड, महाड, कशेडी या भागात हे पथक नेमण्यात आले आहे. या पथकामध्ये मॅकेनिक, पर्यवेक्षकांचा समावेश असल्याची माहिती कार्यालयाकडून देण्यात आली आहे.**

### संपकऱ्यांवर कारवाईची शक्यता

**राज्याप्रमाणे वेतन मिळावे यासह अनेक मागण्यांसाठी महाराष्ट्र एसटी संयुक्त कृती समितीच्या वतीने गेल्या दोन दिवसांपासून संप सुरु करण्यात आला आहे. अनेक फेऱ्या रद्द केल्या आहेत. त्याचा फटका प्रवाशांना बसत आहे. विशेष म्हणजे, कोकणात जाणाऱ्या महाड, माणगाव, रोहा मार्गावरील प्रवाशांची संपामुळे प्रचंड गैरसोय झाली आहे. जिल्ह्यातील ३०४ कर्मचारी संपात सहभागी झाले आहेत. त्यामुळे या कर्मचाऱ्यांविरोधात कारवाई करण्याची शक्यता वर्तविली जात आहे.**

# बांधकाममंत्र्यांकडून चाकरमान्यांसाठी मदत केंद्र



**। पेण । प्रतिनिधी ।**

गेली दोन वर्षे राज्याचे बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्याकडून चारमान्यांसाठी मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर मदत केंद्राची उभारणी केली जाते. यावर्षीदेखील मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या बांधकाम खात्याकडून पेण तालुक्यातील खारपाले आणि पाली फाटा वाकण येथे गणेशोत्सवासाठी जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी मदत केंद्राची उभारणी केली आहे. यामध्ये चहापान कक्ष, वैद्यकीय कक्ष, फोटो गॅलरी, पोलीस मदत केंद्र, विश्रांती कक्ष यांची उभारणी केली आहे.

चाकरमान्यांसाठी चहा, पाणी, बिस्कीट याची मोफत सोय केली असून, त्याचप्रमाणे वाहनांसाठी पंक्चर व हवा भरण्याचे मतद केंद्रदेखील उभारण्यात आले आहे. गेली चार दिवसांत हजारो गणेशभक्तांनी या मदत केंद्राचा लाभ घेऊन आपला प्रवास सुखकर केला आहे. मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या कल्पकतेतून साकारण्यात आलेल्या या मदत केंद्रापासून गणेशभक्तांना होत असलेल्या मदतीमुळे गणेशभक्त महाराष्ट्र राज्य बांधकाम खाते व बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांचे विशेष आभार मानत आहेत.

# बदलापूर रेल्वे स्टेशनवर गोळीबार

## एकाला अटक

**। बदलापूर । प्रतिनिधी ।**

मध्य रेल्वेच्या बदलापूर रेल्वे स्थनाकात गुरुवारी (दि. ५) होम प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर संध्याकाळी सहा वाजण्याच्या सुमारास अंदाधूंद गोळीबाराची घटना घडली आहे. या गोळीबारात एक जण गंभीर जखमी झाला आहे. याप्रकरणी पोलिसांनी एका आरोपीला अटक केली आहे. हा गोळीबार जुन्या वादातून झाल्याची माहिती समोर येत आहे.

बदलापूर रेल्वे स्थनाकात गुरुवारी सायंकाळच्या सुमारास होम प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर चार जणांच्या टोळीकडून प्लॅटफॉर्म उभ्या असलेल्या दोघांवर गोळीबार करण्यात आला. दोघांवर गोळीबार केल्याने त्यापैकी एकाच्या पायात गोळी लागल्याने तो गंभीर जखमी झाला असून, त्याला खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. गोळीबार करत एक आरोपी रेल्वे रुळावरून धाव असतानाच आरपीएफ जावांनी त्याचा पाठलाग करत त्याला पकडले.

जखमी आणि पोलिसांच्या ताब्यात असलेला आरोपी दोघेही सराईत गुन्हेगार असून, पैशांच्या देवाण-घेवाण आणि पैशांचा वाटपावरून त्यांच्यात वाद झाला आणि त्या वादाचे परिणाम गोळीबारात झाल्याची माहिती समोर येत आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग**

**निविदा सूचना**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखांकरीता खालीलप्रकारचे हार्डवेअर, सॉफ्टवेअर पुरवठा करणेसाठीची निविदा मागविण्यात येत आहे. त्याकरीता खालील स्वरुपाची कामे करणाऱ्या मान्यवर व अनुभवी कॉन्ट्रॅक्टर्स/सहकारी संस्था यांचेकडून प्रकारनिहाय, स्वतंत्र माल मजुरीसह निविदा मागविणेत येत आहेत.

1. Online UPS- With 3 hours Battery Backup time using required SMF Battery and other required euipments.
2. CCTV System- I.P. Technology based CCTV System with NVR, Storage Disk and required euipments.
3. Biometric Devices - I Card Reader, Thumb, Fecial (Retina) Detection System with required software.
4. Security Products for Data Centre and Near Data Centre as listed below. CSOC, Antifishing, Firewall, Anti-DDOS, DLP-Network, DLP- Endpoint, DLP- Emali, Mobile Application Security, SFTP
5. Upgradation of various servers at DC-NDR as specified in RFP- RAM, HDD, Tapes etc.

तरी इच्छुक निविदाधारकांनी सदरचा निविदा फॉर्म दिनांक ०७.०९.२०२४ पासून दिनांक १८.०९.२०२४ पर्यंत बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे कार्यालयीन वेळेत सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील. सदर निविदा दिनांक १९.०९.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नावाने सादर करावयात. प्रत्येक निविदा फॉर्मकरीता रू. १०,०००/- फॉर्म फी डी.डी., चेक स्वरूपात स्विकारली जाईल. याबाबत अधिक माहिती बँकेच्या केंद्र कार्यालयामध्ये मिळेल.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची कोणतीही अथवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

केंद्र कार्यालय अलिबाग — सही/-

दिनांक : ०७.०९.२०२४ — **(मुख्य कार्यकारी अधिकारी)**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल सौ. नीता बिपीन परशे यांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकत तिचे विद्यमान मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमूद मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे- भक्ताची वाडी, तालुका-कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| आंबो कानू पारधी<br>पद्या कानू पारधी<br>आवडी कानू पारधी<br>मुक्ताबाई तुकाराम पारधी<br>लालू तुकाराम पारधी<br>जया बबन वारे | २ | ५ | ०.६९.०० यापैकी दिलेले क्षेत्र ०.५३.०० | ०.६९ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकित दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत — खरेदीदारातर्फे वकील

दि. ०७/०९/२०२४ — **ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव**

पत्ता : मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४, डी विंग, मुद्रे बुद्रुक, ता. कर्जत, जि. रायगड

मो. ८१४९२११३६६/७७०९१६०५६७

पान १ वरून

## सत्तेचा माज, बेरोजगारांचे हाल

दोष देत नोकरीच्या प्रतिक्षेत होते. गरीब आई-बाबांना सोडून शहरात राहणं जमणार नाही. म्हणून आपल्याच जिल्ह्यात कुठेतरी रिक्त पदे भरली जातील आणि आपली गाडी रुळावर येईल, या आत्मविश्वासाने ओतप्रोत बेरोजगार आता नोकरभरती प्रक्रियेला मिळालेल्या स्थगितीच्या महाजालात अडकला आहे. सरकारने गेल्या पाच वर्षांत रोजगार देण्याची लालसा दाखवली. मात्र, प्रत्यक्षात फसवणूकच पदरात पडल्याने तरुणांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सत्तेचा माज दाखवण्याऐवजी विकासाचे राजकारण, तरुणांचे हित, महिलांची सुरक्षितता, आरोग्य सुधारणे आवश्यक आहे. मात्र, याकडे सत्ताधारी डोळेझाक करीत आहे. रोजगारावर बोलायचं नाही तर बेरोजगारांना दरमहा त्यांच्या खात्यात पैसे जमा करण्यावर बोलणाऱ्या भ्रष्टाचारी सरकारला त्यांची जागा दाखवून देण्याचे काम तरुण करतील, असा सज्जड दम तरुणांनी दिला आहे.

आजपर्यंत आरडीसीसी बँकेत नियमांनुसार आणि कोणताही आर्थिक हितसंबंध न जोपासता नोकरभरती करण्यात आली आहे. बँकेची भरतीची जाहिरात येताच हजारो तरुणांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज केले. नोकरी मिळेल अशी आशा तरुणांना होती. मात्र, शिंदे सरकारने यात अडवणूक केल्यामुळे त्यांचे स्वप्न पूर्ण होण्यापूर्वीच त्यावर विरजण पडले.

**बेरोजगारीचे राजकारण नको!**

गेली पाच वर्षे सत्ता उपभोगणाऱ्या महायुतीला रोजगारनिर्मितीची अंमलबजावणी करता आलेली नाही. अशा स्थितीमध्ये जर बँक कायद्याच्या चौकटीत रोजगार उपलब्ध करुन देत असेल, तर शिंदे सरकारने त्यात अडथळा आणणे ही लाजिरवाणी बाब असल्याची भावना तरुणांनी व्यक्त केली आहे.

**विकासाचे राजकारण हवे**

विविध योजनांची खैरात आणि विकासकामांचे आमिष दाखवून सत्तेत विराजमान झालेल्या सरकारला गेल्या पाच वर्षांत रोजगार उपलब्ध करुन देता आलेले नाहीत. या सरकारने शेतकऱ्यांना देशोधडीला लावले आहे. या अपयशी सरकारचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या शिंदे सरकारच्या आमदारांनी विकासाचे राजकारण करण्याचे धाडस दाखविणे गरजेचे होते. मात्र, त्यांनी तरुणांच्या तोंडाशी असलेला रोजगाराचा घास हिरावून घेतला आहे.

**अपयशी सरकार**

निवडणुकीपूर्वी मतांसाठी भीक मागत सत्ताधारी नेत्यांनी आपल्या जाहीरनाम्यात रोजगार, रिक्त पदांचा गोषवारा आणि पदे भरण्याची हमी दिली. मात्र, सत्तेत आल्यावर केवळ स्वतःची झोळी भरण्याचे काम त्यांनी केले. कधी आरक्षणाचे कारण, तर कधी आचारसंहितेचे निर्बंध सांगून शिंदे सरकारने बेरोजगारांना केवळ वेठीस धरण्याचे काम केले आहे. केवळ विरोध करायचा म्हणून शिंदे सरकारने नोकरभरती प्रक्रियेत अडथळा निर्माण केला असून, सरकारी अनास्थेमुळे युवकांच्या जीवनाची पुरती वाट लागली असल्याचे मत अवधूत पाटील यांनी व्यक्त केले आहे.

**आगामी निवडणुकीत सरकाला बसणार फटका?**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची भरती जाहीर करण्यात आली. जिल्ह्यातील हजारो तरुणांनी ऑनलाईन अर्ज भरून या प्रक्रियेत सहभाग घेतला. मात्र, आगामी निवडणुकीचे कारण दाखवून ही भरती प्रक्रिया रद्द केल्याने तरुणांची फार मोठी निराशा झाली आहे. एका बाजूला रोजगार देणार असे सांगून आश्वासनांची बोळवण सरकार करीत असताना, दुसऱ्या बाजूला बेरोजगारांना रोजगारापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न होत असल्याचे चित्र आहे. सरकारच्या या दुटप्पी भूमिकेबाबत तीव्र नाराजी निर्माण झाली असून, आगामी निवडणुकीत शिंदे सरकारला त्याचा फटका बसण्याची शक्यता आहे.

## एक लाख गणेशमूर्तींची होणार प्रतिष्ठापना

गणेशमूर्तींची प्राणप्रतिष्ठापना करण्यात येणार आहे.

गणरायाच्या स्वागतासाठी व सजावटीसाठी लागणारी फुले, फळे, वेगवेगळ्या रंगांची तोरणे, पूजेचे साहित्य अशा अनेक वस्तूंनी बाजारपेठा सजल्या आहेत. खरेदीसाठी बाजारपेठांमध्ये गर्दी होऊ लागली आहे. समाजप्रबोधनाचे संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे चलचित्रदेखील अनेक ठिकाणी तयार करण्याचे काम जोरात सुरु आहे. काही ठिकाणी महिला अत्याचार रोखण्याचे आवाहन, तर काही ठिकाणी शिक्षणाला महत्त्व देण्याचा प्रयत्न या चलचित्राच्या माध्यमातून केला जाणार आहे. काहींनी त्यांच्या घरी मूर्ती आणली आहे. तर, काही जण शुक्रवारी आणणार आहेत.

जिल्ह्यात शनिवारी (दि. ७) गणरायाची प्रतिष्ठापना होणार आहे. यामध्ये दीड दिवसांचे २७ हजार, पाच दिवसांचे दोन हजार ५५८, सहा दिवसांचे ५५ हजार, दहा दिवसांच्या १७ हजार ५०३ गणपती बाप्पांची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. गणरायाची मनोभावे सेवा करता यावी यासाठी प्रत्येकाने आपापल्या परीने तयारी केली आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी धार्मिक कार्यक्रमांसह सांस्कृतिक कार्यक्रमदेखील घेतले जाणार आहेत. सामाजिक उपक्रमही राबविले जाणार आहेत. महिलांसाठी संगीत खुर्ची, लहान मुलांसाठी फनी गेम्स, बाल्या नृत्यांचे सादरीकरणही काही ठिकाणी केले जाणार आहेत. जिल्ह्यात सध्या महिला अत्याचाराच्या घटना वाढल्या आहेत. या घटना रोखण्यासाठी काही मंडळांनी चलचित्राद्वारे महिला, स्त्रीचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

**पोलिसांचा कडेकोट पहारा**

रायगड जिल्ह्यात गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. हा उत्सव आनंदात व शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस सज्ज झाले आहेत. जिल्ह्यातील प्रत्येक मंडळाच्या ठिकाणी पोलिसांचा पहारा ठेवला जाणार असून, एक हजारहून अधिक पोलिसांच्या मदतीने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचा प्रयत्न केला जाणार आहेत. पोलिसांसोबत दोनशेहून अधिक होमगार्ड जवानांची मदतही घेतली जाणार आहे.

**महामार्गावर वाहतूक पोलीस**

मुंबई, ठाण्याकडून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुखकर व्हावा, त्यांना त्यांच्या गावी वेळेवर पोहोचता यावे, वाहतूक कोंडी निर्माण होऊ नये यासाठी जिल्हा वाहतूक शाखेचे कंबर कसली आहे. जिल्ह्यातील नव्वदहून अधिक वाहतूक पोलिसांच्या मदतीने वाहतूक कोंडी सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यासाठी वाहतूक पोलीस महामार्गावर रवाना झाले आहेत.

## फडणवीसांवर अविश्वास?

व इतर नियोजनासाठी चार मंत्र्यांना मैदानात उतरवणार आहेत. प्रचाराची जबाबदारी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे दिली जाणार आहे. परंतु, लोकसभेतील निकाल पाहता, देवेंद्र फडणवीस यांच्याऐवजी नितीन गडकरी यांच्याकडे विशेष प्रचारप्रमुख म्हणून जबाबदारी असणार आहे.

नितीन गडकरी यांचा चेहरा विधानसभा निवडणुकीत वापरावा, असा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आग्रह होता. त्यांच्या चांगल्या प्रतिमेचा भाजपला राज्यात फायदा होईल असे संघाचा अंदाज आहे. नितीन गडकरी हे विशेष प्रचारक, रावसाहेब दानवे हे प्रमुख संयोजक तर देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे हे प्रचाराचे नेतृत्व करणार आहेत.

## सुधीर चेरकरला पोलीस कोठडी

मारहाण करून फरार झालेल्या सुधीर चेरकरला शोधण्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करण्यात आले होते. अखेर त्याला शुक्रवारी पहाटे लपून बसलेल्या ठिकाणाहून पोलिसांनी जेरबंद केले. दुपारी अलिबाग येथील न्यायालयात त्याला हजर केले असता न्यायालयाने शनिवारपर्यंत दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यामुळे सुधीर चेरकर याचा गणेशोत्सव जेलमध्येच साजरा होणार आहे.

**क्लासिफाईड**

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

■ Office staff required for Office in Alibag Fresh graduates can come for interview Call 9923750549 Between 11 am to 6 pm

■ महा-ई-सेवा/आधार केंद्राकरीता अनुभवी कॉम्प्युटर महिला ऑपरेटर पाहिजेत. इंग्रजी, मराठी टायपिंग आणि अनुभवी उमेदवारास प्राधान्य. संपर्क : श्री वरद ऑनलाईन सर्व्हिसेस. शंकर-पार्वती अपार्टमेंट समोर, शेतकरी भवन रोड, चेंढरे, अलिबाग लिव्ह अँड लायसन्स/ऑनलाईन रेंट ॲग्रीमेंट सर्व्हिस उपलब्ध. मो. ८३०८०२२६६४, (व्हाटसअॅप) ७३८५६११२९१

■ सर्वप्रकारचे आजार, संतानप्राप्ती आर्युवैदिक निसर्गोपचाराने/विवाहनोंदणी/कर्ज/ठेवींवर लाखास दरमहा ३०००/- घरबसल्या कामासाठी डॉ.नथुराम शिहू/रायगड ४०२१०६ (पोयनाड-नागोठणा) ७०२००८५२०९

■ अलिबाग एस.टी.स्टॅन्ड समोर 'अलिबाग प्राईड' येथे पहिला माळा, 'रोड फेसिंग' सेमी कमर्शिअल फ्लॅट भाडेतत्वावर देणे/विकणे आहे. Area1000 sq.ft (2BHK Flat) Contact : 9579548535 (स.९ ते सं.६)

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

**स्थावर मिळकत जप्ती आदेश**

(महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १०७ (१०) प्रमाणे)

**वाचले,**

१) लवाद दावा क्रमांक २२/२०२३ मधील दिनांक १३/१२/२०२३ रोजीचा वसुली दाखला

२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ (१०) व (११)

३) वसुली व विक्री अधिकारी यांची मागणी नोटीस जा.क्र. रिकव्हरी/१५६/१५४/२४ दि.१०/०६/२०२४

जा.क्र./एस.आर.ओ./३००/सन २०२४
वसुली अधिकारी, यांचे कार्यालय,
रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांचा महासंघ मर्या.
अलिबाग, कृष्णमंदिर सोसा, मारुती नाका अलिबाग
जि. रायगड फोन नं. ९१५६७६६०७७
दिनांक :- ०६/०९/२०२४

**जप्तीची नोटीस**

ज्याअर्थी जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड यांनी लवाद हुकुमनामा क्रमांक २२/२०२४ मधील दिनांक १३/१२/२०२३ रोजीच्या वसुल दाखल्यात नमुद केलेप्रमाणे श्री. महेंद्र मधुकर पाटील यांनी जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग या पतसंस्थेतून कर्ज घेतले असून, सदरचे कर्ज थकीत झाल्यामुळे व दावा रक्कम रुपये २८,९८,४०६/- + व्याज व इतर खर्च न भरल्यामुळे श्री. महेंद्र मधुकर पाटील व जामिनदार/तारणदार श्री. महादेव मधुकर पाटील यांची खालील वर्णनाची मालमत्ता आज दिनांक ६/०९/२०२४ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ (१०) व (११) अन्वये जप्त करण्यात आली आहे. या आदेशानुसार त्या मालमत्तेचे हस्तांतरण अगर विक्री अथवा त्यातील हितसंबंधाचे कोणतेही खाजगी हस्तांतर किंवा मालकी हक्कातील बदल अथवा त्या मालमत्तेवर निर्माण केलेला कोणताही बोजा निर्णीत अर्जदार धनकोविरुध्द रद्द व निरर्थक होईल.

**मालमत्तेचे वर्णन**

| निवाड्याची किंवा आदेशाचा क्र व दिनांक | निवाडा किंवा आदेश ज्या इसमाविरुद्ध दिला आहे त्यांची नावे व पत्ते | मालमत्तेचे वर्णन व पत्ता | शेरा इतर बोजे |
|---|---|---|---|
| २२/२३<br>१३/१२/२३ | १. श्री. महेंद्र मधुकर पाटील<br>मु. साईदर्शन सीएचएस युनिट नं. १ प्लॉट नं. १२३, से.१६ अ नेरुळ नवी मुंबई<br>२. श्री. प्रफुल्ल विठोबा पाटील<br>मु. सोमेश्वर वैभव सोसा. ब्राह्मण आळी अलिबाग जि. रायगड<br>३. श्री. आदेश नरेश म्हात्रे<br>मु. मोठे शहापुर ता.अलिबाग जि. रायगड<br>४. श्री. समीर गंगाधर पाटील<br>मु. कुरकंडी कोलटेंभी पो. पोयनाड ता. अलिबाग जि. रायगड<br>तारणदार/जामिनदार<br>५. श्री. महादेव मधुकर पाटील<br>मु. श्रीगांव पो. पोयनाड ता. अलिबाग | मौजे श्रीगांव ता.अलिबाग येथील भुमापन क्र. व उपविभाग ४२९, क्षेत्र ०-४३-९० आकार रु.१.१४ व सदरहु मिळकतीवर असलेले ग्रामपंचायत श्रीगांव घर मिळकत क्र. ७४० पक्के घर क्षेत्र ४०० चौ. फुट हि जमीन व घर मिळकत | |

येणे रक्कम, त्यावरील होणारे व्याज व कायदेशीर खर्च जप्ती आदेशाचे तारखेपासून पंधरा दिवसांचे आत भरणा न केल्यास वर नमूद केलेली मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल.

सिल — **श्री. विवेक वि.पाटील**
वसुली अधिकारी
रायगड-अलिबाग

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. धाकल्या बाबू केंडा, २) सौ. सावित्री रामचंद्र होगाडे, ३) सौ. अस्मिता सुरेश लांबोरे, यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे पक्षकार यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांसोबत व्यवहार ठरलेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**- मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र.व उपविभाग क्र. | क्षेत्रफळ (आर.चौ.मी) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| कुहिरे, ता. पेण, जि. रायगड | ३८१/१ | जिरायत क्षेत्र ०-२३-००<br>वरकस क्षेत्र ३-५६-००<br>एकुण ला.यो क्षेत्र ३-७९-००<br>पो.ख १-१८-००<br>एकूण क्षेत्र ४-९७-०० | ६.७६ |

वर नमुद मिळकतीपैकी १) श्री. धाकल्या बाबू केंडा, २) सौ. सावित्री रामचंद्र होगाडे, ३) सौ. अस्मिता सुरेश लांबोरे यांच्या नावे असलेल्या क्षेत्रापैकी २-००-०० हे. आर. इतक्या क्षेत्राबाबतचे

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वर नमुद मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्या संबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : अलिबाग — **ॲड. विनित जितेंद्र वर्तक**

दिनांक : ०६/०९/२०२४ रा. बुरुमखाण, वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड

मो. नं. ७३५००७१६९३/९२८४४२२४११

**पनवेल महानगरपालिका**

**शहर अभियंता विभाग**

**ई-निविदा सूचना**

निविदा सुचना क्र.पमपा/बांधकाम/४४२४/प्र.क्र.०३/३७७३/२०२४ — दिनांक: ०६/०९/२०२४

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/ निम शासकीय (Central Government / State Government / Government under taking )विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पद्धतीनुसार ई-निविदा मागवित आहेत.

| अ.क्र | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रू. (Without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/ ११८/२०२४-२५ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-अ, प्रभाग क्र.०१ मधील ओवे कॅम्प खारघर येथे समाज मंदिर उभारणे | ५३,८१,६१२/- |

या कामाच्या ई-निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि.०९/०९/२०२४ प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**अतिरिक्त आयुक्त-I**
**पनवेल महानगरपालिका**

**पनवेल महानगरपालिका**

शिक्षण विभाग, लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय, आगरी समाज हॉल व दांडेकर हॉस्पिटल समोर, पनवेल - ४१०२०६.

Email : msbpanvel१९९३@gmail.com — Emai: panvelcorporation@gmail.com

जा.क्र./पमपा/शिक्षण/ ४४५/२०२४ — दिनांक : ०५/०९/२०२४

**अंदाजपत्रक बनविणेकामी दरपत्रक**

| अनु. क्र | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | निविदा/पमपा/शिक्षण/ ०८/२०२४ | पनवेल महानगरपालिकेतील प्राथमिक शाळेतील इ. ६ वी ते ७ वीच्या ३९९ विद्यार्थ्यांना सुंदर हस्ताक्षर करिता हस्ताक्षर सुधारणा प्रकल्प राबविणेबाबत. |

या निविदेबाबतची माहिती वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदरबाबतची दरपत्रके दि.०५/०९/२०२४ ते दि. १३/०९/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत शिक्षण विभाग, पनवेल महानगरपालिका शिक्षण विभाग (लोकनेते दि.बा.पाटील विद्यालय,) येथे सादर करण्यात यावी. सदर कामाबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात प्राप्त होईल याची संबंधित निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

सही/-
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)




# अलिबागकरांच्या दोन पुस्तकांना मानाचा पुरस्कार



**। अलिबाग । वार्ताहर ।**

लेखिका वर्षा कुवळेकर लिखित 'सावळ्या विठ्ठलाच्या देशात' आणि लेखक अजित देशमुख लिखित 'पोलीस मन' या दोन्ही पुस्तकांना मानाचा असा 'दत्तात्रेय कृष्णा सांडू-चेंबूर'चा पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे. ओघवत्या, पण सरळ आणि सोप्या भाषेत लिहिलेल्या दोन्ही पुस्तकांचे लेखक अलिबागचेच आहेत.

**'सावळ्या विठ्ठलाच्या देशात', 'पोलीस मन' या पुस्तकांचा समावेश**

आफ्रिकेतील केनिया देशातील नैरोबी या शहराला भेट देऊन आलेल्या वर्षा कुवळेकर यांच्या 'सावळ्या विठ्ठलाच्या देशात' या पुस्तकाला, तर आयुष्याची ३५ वर्षे पोलीस सेवेत व्यतीत करुन एसीपी म्हणून निवृत्त झालेल्या राष्ट्रपती पदक विभूषित अजित देशमुख यांनी लिहिलेल्या 'पोलीस मन' या पुस्तकालाही हा पुरस्कार मिळाला आहे. खाकी वर्दीत असलेल्या आपल्या समाजरक्षण करणाऱ्या पोलिसांनाही मन-भावना-कुटुंब-नातीगोती असतात आणि कर्तव्य निभावताना त्याचं तारतम्य बाळगावे लागते याचे दृश्यवर्णन अजित देशमुखांनी त्यांच्या पुस्तकात केले आहे. असाच कीर्तीमान पुरस्कार यापूर्वीही अजित देशमुखांच्या पुस्तकाला सर्वद फाऊंडेशन यांच्यातर्फे प्राप्त झाला आहे.

वर्षा कुवळेकर या गृहिणी आहेत. त्यांचे हे दुसरे पुस्तक असून, 'सावळ्या विठ्ठलाच्या देशात' या पुस्तकाला यापूर्वी मराठी साहित्य परिषदेचा 'सावित्रीबाई फुले पुरस्कार', सर्वद फाऊंडेशनचा 'स्टार पुरस्कार' आणि सारांश मासिकातर्फे 'साहित्य पुरस्कार' प्राप्त झाला आहे. अलिबागकरांना अभिमान वाटेल असा साहित्य पराक्रम देशमुख व वर्षा कुवळेकर यांनी केल्याबद्दल त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.




## मोदक स्पर्धेत सरला नाईक प्रथम

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मुंबई कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, अलिबाग येथे मोदक स्पर्धा नुकतीच आयोजि करण्यात आली. या स्पर्धेमध्ये खुल्या गटात सरला नाईक आणि विद्यार्थी गटातसलोनी मयेकर यांनी प्रत्येकी प्रथम क्रमांक मिळविला. या स्पर्धेला प्रमुख परीक्षक म्हणून नलिनी काकू मुंबईकर ,यू ट्यूब सेलिब्रिटी, रॅडिसन ब्लूचे बेकरी विभागातले शेफ सुरेश म्हात्रे, आणि रॅडीसन ब्लूमधील एचआर व्यवस्थापक ज्ञानेश्वर राऊत यांनी काम पाहिले.

विद्यार्थी व खुला गट अशा दोन गटामध्ये स्पर्धा घेण्यात आली होती. खुल्या गटात अनेक सुगरणींनी भाग घेतला होता. तसेच विद्यार्थीदेखील या स्पर्धेत उत्साहात सहभागी झाले होते.

स्पर्धकांनी तयार केलेल्या मोदकांची चव स्पर्धकांनी घेतली. त्यानंतर त्या मागील संकल्पना समजून घेतली. अखेर स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. खुल्या गटात सरला नाईक यांनी प्रथम क्रमांक मिळविला असून मिरा घरत यांनी द्वितीय व प्रिती म्हात्रे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. विद्यार्थी गटात सलोनी मयेकर यांनी प्रथम, मानस म्हात्रे यांनी द्वितीय व अक्षय महाडिक यांनी तृतीय क्रमांक मिळविला. या विजेत्यांना पारितोषिक आणि सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच रिया पडवळ, वृषभ भोईर व ऋतिक गायकवाड यांना उत्तेजनार्थ बक्षीस म्हणूमन सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.


या सोहळ्याची संकल्पना , त्याचे सादरीकरण आणि ते पूर्ण करण्याचे महत्त्वाचे काम प्रा. रश्मी वाघे यांनी केले. कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन प्रा. श्रेयस म्हात्रे, आणि प्रा. गंधर्व पाटील यांनी केले. प्रा. आशुतोष गुरव, प्रा. स्वरांगी कवळे, आश्लेषा लोहार, महेश वेळे आणि निलदीप पाडावे यांनीही कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथक प्रयत्न केले. प्रा. अनुराधा तेरेदेसाई यांनी आभार व्यक्त केले.




## महावितरण कामगार आंदोलनाच्या पवित्र्यात

**दिघी :** श्रीवर्धन महावितरणचे सहाय्यक अभियंता चालिकवार यांच्या मनमानी कारभाराविरोधात वीज कामगार महासंघाच्या कर्मचाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत आंदोलनाचा इशारा दिला आहे. अनेक कारणांमुळे कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे पत्र उप कार्यकारी अभियंता यांना देण्यात आले आहे.



# गणरायाचे स्वागत

हिंदू धर्मात तेहतीस कोटी देव आहेत असे म्हणतात. हे तेहतीस कोटी म्हणजे ३३ वर सात शून्ये असलेला आकडा नसून तेहतीस प्रकारचे (कोटी म्हणजे श्रेणी किंवा प्रकार) देव असल्याचा अर्थ काही मंडळी सांगतात. ते काहीही असो भारतात प्रदेशागणिक वेगवेगळे देव आहेत हे खरेच. महाराष्ट्रातला विठ्ठल उत्तर भारतात नाही, राजस्थानातला श्रीनाथ कर्नाटकात नाही आणि तामिळनाडूतला मुरुगन पंजाबात नाही. शैव आणि वैष्णव असे दोन मुख्य पंथ आहेत. त्यामुळे शंकर आणि विष्णूच्या अवतारांची स्थाने भारतभर आहेत. पण हिमाचल प्रदेशासारख्या काही राज्यात देवींची स्थाने व महात्म्य अधिक आहे. आदि शंकराचार्यांचा जन्म ज्या प्रदेशात झाला त्या केरळात साबरीमाला आणि पद्मनाभस्वामी यांची थोरवी अधिक आहे. त्यांची देवळे इतर कोठेही नाहीत. सारांश या देशात देवांचा भरपूर सुकाळ आहे आणि ते सर्व सुखाने नांदत आहेत. उत्तर भारतात राम आणि श्रीकृष्णाचे फार महत्व आहे. त्यांच्या चरित्रांशी संबंधित ठिकाणे, जसे की अयोध्या, मथुरा इत्यादी असल्यामुळे असेल, पण तेथे त्यांना भजणाऱ्यांची संख्या अधिक आहे. महाराष्ट्रात या दोन्हींची भक्ती होते. पण पंढरपूरचा श्रीविठ्ठल, जेजुरीचा खंडोबा, कोल्हापूरचा जोतिबा अशांचे महात्म्य अधिक आहे. फार जुन्या काळापासून त्यांच्या अनेक कथा, धार्मिक परंपरा चालत आलेल्या आहेत. कोकणात प्रत्येक गावाचे एक ग्रामदैवत असते. त्याचा उत्सव वा जत्रा आणि त्याच्या पालख्या ही गावकऱ्यांसाठी पर्वणी असते. याखेरीज प्रत्येकाच्या घरात एक देव्हारा असतो. तिथे पिढ्यानपिढ्यांपासून पूजले जाणारे देव असतात. घरांच्या आसपासचे वड, पिंपळ, उंबर अशी झाडे आणि विहिरी आणि नद्या अशा पाण्याच्या ठिकाणांनाही देवत्व मिळालेले असते. त्यांच्या म्हणून रुढी असतात. प्रत्येक सणाला महापुरुषाचे नैवेद्य अशाच कोणत्या तरी ठिकाणी ठेवले जातात. दारातली तुळस आणि गाईगुरेही देवच असतात. गायीच्या पोटात तर तेहतीस कोटी सगळेच देव असतात.

### अत्र, तत्र, सर्वत्र

जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी देव असतो म्हणतात तो हाच. तरीही श्रीगणेशाला घरी आणून त्याचा खास पाहुणचार करण्याची कल्पना ज्याने केली त्याला थोरच म्हणावे लागेल. विशेष म्हणजे गणेशासोबत त्याची आई गौरी हिचाही सन्मान होतो व तिचे माहेरपण केले जाते. संपूर्ण जगात व अन्य कोणत्याही धर्मात दरवर्षी देवाला काही दिवसांसाठी घरी आणून पूजा करण्याची अशी प्रथा असेल असे वाटत नाही. घरोघरीचा हा गणेशोत्सव हे शंभर वर्षांपूर्वीपर्यंत केवळ कोकणाचे वैशिष्ट्य होते. देशावर, मराठवाड्यात किंवा अन्यत्र हा प्रकार जवळपास नव्हता. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केल्यानंतर या प्रथेकडे लोकांचे लक्ष गेले. तरीही अगदी चाळीस-पन्नास वर्षापूर्वीपर्यंत कोकण, मुंबई व पुणे यापुरताच घरगुती गणेशोत्सव मर्यादित होता. आता मात्र महाराष्ट्रात तो सर्वदूर पोचला आहे. अगदी नंदूरबार आणि गडचिरोली या आदिवासी प्रांतात देखील गणेशबुवा घरोघरी जाऊ लागले आहेत. पलिकडे तेलंगणा व तमिळनाडूमध्येही या उत्सवाचा विस्तार झाला आहे. महाराष्ट्राच्या संगतीने गुजरात, मध्य प्रदेश या प्रांताना त्याची सवय लागली आहे. होता होता येत्या काही वर्षात तो पूर्ण भारतभराचा उत्सव होईल असे दिसते. आखातात किंवा युरोप-अमेरिकेत जाऊन राहिलेले भारतीय तिकडेही हा सण साजरा करू लागले आहेतच. त्यांच्यासाठी होड्या व विमाने भरभरून येथून गणेशाच्या मूर्ती पाठवल्या जात असतात. अमेरिकी राष्ट्राध्यक्ष आणि ब्रिटनचे पंतप्रधान दिवाळी साजरी करू लागले आहेतच. काही वर्षांनी परदेशस्थ भारतीयांच्या सहवासाने तेथेही गणपती विराजमान होऊ लागले तर आश्चर्य वाटायला नको. थायलंड, इंडोनेशिया, जावा, व्हिएतनाम या प्रांतात पुरातन काळात हिंदू संस्कृती पोचल्याचे अवशेष आहेत. त्यात गणेशाच्या मूर्ती व उल्लेखही आहेत. त्यामुळे काही काळाने तेथेही गणेशोत्सव साजरा होऊ शकेल.

### ...तरीही तो येतोच

देव दानवा नरे निर्मिले असे संत सांगून गेले आहेत. या सृष्टीची निर्मिती जगन्नियंत्याने केली आणि तोच हा सर्व पसारा सांभाळतो अशी कल्पना सर्व धर्मांमध्ये केलेली आहे. मात्र त्या देवांना सगुण, मूर्तरुप देण्यामध्ये जितकी विविधता हिंदू धर्माने दाखवली तितकी अन्यांमध्ये क्वचितच दिसेल. या देवांना माणसाची रुपे मिळाली, माणसांसारखेच रागलोभ त्यांनाही आहेत असे मानले गेले. शंकर हा कोपिष्ट मानला गेला, विठ्ठल हा दीनाघरी धावणारा, दयाळू म्हणून कल्पिला गेला. गणपती हा या सर्वांहून वेगळा. तो बुध्दीचा देव. कार्यारंभी त्याची पूजा केली की सर्व काही निर्विघ्नपणे पार पडते अशी श्रद्धा लोक बाळगू लागले. असा हा गणपती घरी येतो तो घरातल्या लाडक्या, पण एरवी दूरदेशी असलेल्या मुलासारखा. दीड किंवा पाच किंवा दहाच दिवसांसाठी तो येत असल्याने त्याचे आगतस्वागत विविध तऱ्हांनी केले जाते. त्याच्या मिषाने मोदक आणि इतर पक्वान्ने केली जातात. आज अनेक ठिकाणी प्रचंड मोठ्या मूर्ती, अतिशय झगमगाटी आरास आणि दिवे, बोंबलणारे संगीत लावून गणरायाला बोलावले जाते. सार्वजनिक गणेशोत्सव हा तर तद्दन बाजारू झाला आहे. मात्र गणेशाला घरी बोलावण्याचा मूळ उत्सव असा नव्हता. त्यातला भाव साधासुधा होता. आरास आजूबाजूला मिळणाऱ्या सुंदर फुलांची होती. दिवे अगदी मंद तेवणारे होते. प्रसाद साधा गूळखोबऱ्याचा होता. चढाओढ आणि संपत्तीची उधळण नव्हती. बुध्दीदाता म्हणवणाऱ्या देवाला अशी उधळण पसंतही पडणारी नाही. मुळात देवाला घरी बोलावणे यात एक घरगुती आनंद होता. त्या त्या कुटुंबातील मुलाबाळांना त्यांच्यातलाच एक खेळगडी वाटावा, तर मोठ्यांना त्यांच्या आयुष्यातल्या संकटांमध्ये, संघर्षामध्ये आधार देणारा वाटावा असा हा मामला होता. पण जगरहाटी बदलली. तशी श्रध्दाही बदलल्या. पैसा हाच सर्वात मोठा देव झाला. त्यामुळे गणेशाने आपली भरभराट करून टाकावी अशी जवळपास फर्मानेच आता निघत असतात. असो. हे सगळे सहन करूनही गणराय दरवर्षी येतो. तसा तो यंदाही आला आहे. त्याचे स्वागत.

विचार

# ग्रंथालय राष्ट्र विकासाच्या वाटचालीत दीपस्तंभ

**ज्योती म्हात्रे**

आजची अर्थव्यवस्था ज्ञानाधिष्टीत होत आहे. आज राष्ट्राची सर्व शासकीय व्यवस्था ही ज्ञानकेंद्रीत होत आहे. माहिती आणि तंत्रज्ञानात अग्रेसर राष्ट्र आज विकसित होत आहेत. त्यामुळे आपल्याला ज्ञान निर्मितीची, संकलन आणि प्रसारांची केंद्रे असलेली ग्रंथालय समृद्ध करून राष्ट्र विकासाला चालना द्यावी लागेल. तरच एक सुसंस्कृत, सुजाण, सर्जनशील, स्नेहमय राष्ट्र विकसित होईल.

प्रत्येक राष्ट्राची एक स्वत:ची संस्कृती आणि इतिहास असतो. त्यांचे संवर्धन, जतन आणि प्रसारण करण्यासाठी राष्ट्रीय ग्रंथालय स्थापन केली जातात. देशाच्या ग्रंथालय पद्धतीत राष्ट्रीय पातळीवर असणारी ग्रंथालय म्हणजे राष्ट्रीय ग्रंथालय होय. राष्ट्रीय ग्रंथालयाचे प्रमुख वेशिष्ट्ये म्हणजे या ग्रंथालयत सर्व ज्ञानशाखेतील ग्रंथ संग्रह असतो. ग्रंथालयातील कर्मचारी विविध विषयातील प्रशिक्षित असतात.

राष्ट्रातील वाचन साहित्याचे कायदेशीर जतन करण्याचे उद्दिष्ट असल्याने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ग्रंथसूची तयार करणे सहज शक्य होते. देशाची प्रतिमा आणि प्रतिष्ठा ज्यातून व्यक्त होते असे सर्व वाचन साहित्य संग्रहित करणे हे राष्ट्रीय ग्रंथालयाचे प्रमुख कार्य आहे.

राष्ट्रातील सर्व क्षेत्रातील ग्रंथालयांना मार्गदर्शन करणे. राष्ट्रात प्रकाशित होणारी ग्रंथ आणि ग्रंथेत्तर साहित्य संग्रहीत, जतन आणि प्रसारित करणे. शासनाला ग्रंथ सेवा देणे, देशाविषयी प्रकाशित साहित्य संग्रहित करणे. देशाविषयी आवश्यक परदेशी साहित्याचे संवर्धन करणे तसेच वाचन साहित्य, ग्रंथकोशांविषयी आणि दस्तऐवज आणि सेवा याविषयी रेफरल केंद्र म्हणूनही कार्य करून राष्ट्रीय ग्रंथालय राष्ट्र विकासात योगदान देते.

**राष्ट्र विकासाचा आधारस्तंभ**

राष्ट्र विकासाच्या वाटचालीत सार्वजनिक ग्रंथालय महत्वाचा आधारस्तंभ म्हणून कार्य करतात. लोकांचे, लोकांसाठी लोकांनी चालवलेले ग्रंथालय म्हणजे सार्वजनिक ग्रंथालय होय. सार्वजनिक ग्रंथालय हे लोकांचे विश्वविद्यापीठ आहे. लोकांच्या सहकाऱ्यातून चालवली जाणारी लोकसंस्था आहे. ही ग्रंथालय ज्ञान व माहितीचे आगर आहेत. राष्ट्रातील एक सांस्कृतिक केंद्र म्हणून ही ग्रंथालये सेवा देतात.

युनेस्कोने सार्वजनिक ग्रंथालयाचा जाहीरनामा १९४९ मध्ये प्रकाशित केला. त्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयाबाबत असे म्हटले आहे की , ''सार्वजनिक ग्रंथालय ही शिक्षण, संस्कृती व महितीचा स्त्रोत असून ही आंतरराष्ट्रीय सामंजस्य आणि शांततेचे प्रतीक आहे.'' म्हणूनच म्हणावेसे वाटते की सार्वजनिक ग्रंथालय ही स्थानिक पातळीपासून ते आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत विकास कार्यात सहभागी होऊन राष्ट्र विकासाचा आधारस्तंभ होतात.

कोणतीही व्यक्ती, समाज वा राष्ट्राच्या जडणघडणीत ग्रंथ आणि ग्रंथालयाचं महत्त्व अनन्य साधारण असं आहे. बौद्धिक विकासाचं शक्तिकेंद्र आणि सामाजिक विकासाचं उर्जाकेंद्र म्हणून सार्वजनिक ग्रंथालयाची आवश्यकता असते. राज्यातील ग्रामीण आणि शहरी विभागातील जनतेला सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि सर्व क्षेत्रातील विविध बाबींची आणि विविध विषयांची परिपूर्ण माहिती मिळावी यासाठी सार्वजनिक ग्रंथालय कार्य करते . भारतात ६ लाख २५ हजार गांव आहेत. त्या सर्व गावात सार्वजनिक ग्रंथालय स्थापन केल्यास ६ लाख २५ हजार सार्वजनिक ग्रंथालय निर्माण होतील आणि त्यामध्येमातून आपण शासनाच्या विविध योजना, बाजारपेठेची माहिती, शिक्षण प्रसार, सामाजिक आणि आर्थिक विकास करता येईल. तसेच ग्रामीण विकासा संबंधित जागृती कार्यक्रम, मानवाधिकार व सामाजिक विकास संबंधित कार्यक्रम, युवक, महिला आणि बाल विकास संबंधित कार्यक्रम, आरोग्य संबंधित कार्यक्रम, पर्यावरण पर्यावरणशास्त्र आणि जैव विविधता विकास कार्यक्रम, विज्ञान आणि तंत्रज्ञान विकास कार्यक्रम, कला आणि संस्कृती संबंधित कार्यक्रम इ. विकास संबंधित कार्यक्रम ग्रंथालयाच्या माध्यमातून घेऊन राष्ट्र विकास केला जातो.

**राष्ट्राच्या शैक्षणिक विकासाचा मानदंड**

शैक्षणिक संस्थेशी संबंधित ग्रंथालय म्हणजे शैक्षणिक ग्रंथालय होय. विद्यार्थ्यांना भावी जीवनात मानाचे आणि योग्य स्थान मिळावे म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा. विद्यार्थ्यांमध्ये असलेली वाङ्मयीन आणि कलात्मक गुणाची वाढ करण्याच्या उद्देशाने शैक्षणिक ग्रंथालय स्थापन केली जातात. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक, तांत्रिक, नैतिक समृद्धी एक शांत सामाजिक चळवळ म्हणून दिशा देणे, एक कृतीशील भूमिका बजावणे आणि वाढणे किंवा समृद्ध राष्ट्र निर्माण करण्यासाठी पुढाकार घेऊन कार्य करणे हे शैक्षणिक ग्रंथालयाच्या माध्यमातून सहज होऊ शकते. शिक्षण मानवी आणि आर्थिक विकासाची एक महत्वाची गुंतवणूक आहे. महाविद्यालये, विद्यापीठे, प्रयोगशाळा, कौशल्य विकास केंद्रे, स्पर्धापरीक्षा तयारी केंद्रे, योग आणि आध्यात्मिक केंद्रे, क्रीडा प्रशिक्षण केंद्रे, व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण केंद्रे संशोधन आणि इतर संस्था मध्ये ग्रंथालय स्थापन करून शिक्षण आणि ज्ञान करून विकास आणि प्रगती करणे शक्य होईल.

पाठ्यपुस्तके सर्वाधिक प्रमाणात आपल्या राष्ट्रीय संस्कृती प्रतिनिधित्व करणारे शैक्षणिक साधन म्हणून वापरले जाते. पाठ्यपुस्तकातून आपले राष्ट्र, राष्ट्रीय मूल्ये, संस्कृती, विचारधारा आणि जीवन प्रणाली यांचे दर्शन घडते. राष्ट्रीय संस्कृती, सामाजिक मूल्य आणि राष्ट्रीय एकात्मता वाढवण्यासाठी प्रभावी माध्यम आहे.

राष्ट्र विकास मिशनचे कार्य ग्रंथालयाच्या सहकार्याने उत्तम करता येऊ शकते.

उमेश मल्होत्रा यांनी सन २००४ मध्ये हिप्पोकंपस रीडिंग संस्था स्थापन करून हिप्पोकंपस वाचनालय शाळेच्या माध्यमातून सुरू केली. तसेच सन २००५ मध्ये तमिळनाडू येथे ९५ सरकारी आणि खाजगी शाळाच्या माध्यमातून वाचनलये सुरू करण्यात आली. त्याचा फायदा पंचेचाळीस हजार मुलांना झाला. सन २०१० मध्ये वाचनखोली या नावाने एक उपक्रम १०० हून अधिक शाळेत सुरू करण्यात आला.

हिप्पोकंपस लर्निंग सेंटर च्या मध्येमातून शाळा आणि अंगणवाड्या सुरू करून त्यात वाचनालय स्थापन केली. या उपक्रमातून उमेश यांनी गणित, विज्ञान आणि जीवन शिक्षण या सारखे विषयांचे ज्ञान दिले. या उपक्रमासोबतच इतर शाळांना मदत होतील असे वाचनालयाशी संबंधित उपक्रम, कार्यशाळा, प्रशिक्षण, शिष्यवृतीचे कार्य हिप्पोकंपस संस्थेच्या माध्यमातून केली जातात. अशा प्रकारचे उपक्रम भारतातील सर्व शाळेत घेतल्यास ज्ञानमय समाज निर्माण होईल आणि त्यातून समृद्ध राष्ट्र विकसित होईल. आपण एका चौकस आणि नावीन्यपूर्ण-ज्ञान देणाऱ्या समाजात जगत आहोत. आपल्याला जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर संशोधन आणि विश्लेषणात्मक विचार, कौशल्य आणि वृत्ती विकसित करण्यात शैक्षणिक ग्रंथालयाल महत्वाची भुमिका बजावून राष्ट्राच्या शैक्षणिक विकासाचा मानदंड ठरतात. संशोधनाचे चक्र ग्रंथलयातून सुरू होते. संशोधन संस्थेमध्ये असणारे ग्रंथालय म्हणजे संशोधन ग्रंथालय होय. ज्ञानाच्या सर्व शाखांमध्ये संशोधन आणि विकास होत असतो. त्यामुळे विज्ञान, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र अशा क्षेत्रातील संशोधनासाठी स्वतंत्र संस्था आणि ग्रंथालय यांची आवश्यकता निर्माण झाल्याने त्या त्या क्षेत्रात संशोधन ग्रंथालय स्थापन होऊ लागली. संशोधन संस्थेमध्ये उच्च दर्जाचे संशोधन व्हावयास पाहिजे असेल तर सुसज्ज आणि समृद्ध ग्रंथालय हवे. ग्रंथालय वाचन साहित्या सोबतच संशोधनासाठी लागणाऱ्या अनेक सोयी- सुविधा पुरवते. संशोधन संस्थेत कार्याची सातत्याता धारण करण्याचे कार्य ग्रंथालय करतात कारण संस्थेत संशोधक येतात जातात पण संस्थेचे कार्य दृश्य स्वरुपात ठेवण्याचे काम ग्रंथालय करतात. संशोधन ही सर्जनशीलता असते आणि ही सर्जनशीलता ज्ञानातून निर्माण होते. ज्ञान निर्मिती, संग्रह आणि प्रसार प्रचार करणारे भांडार म्हणून संशोधन ग्रंथालय कार्य करतात.

ग्रंथ, दुर्मिळ साहित्य, शासकीय प्रकाशने, संशोधन अहवाल व प्रबंध, पेटंट्स, मानके, ग्रंथेत्तर संशोधन साहित्य, ताम्रपट, भुर्जपत्रे, हस्तलिखिते, चित्रे, छायाचित्रे, माहितीपत्रे आणि संगणकीय साहित्य इ. वाचन साहित्य संशोधन ग्रंथालयात उपलब्ध असते. या वाचन साहित्यातून संशोधकास नवी माहिती आणि ज्ञान मिळून नव नवीन संशोधन निर्माण होतात. प्रचलित जागरूकता सेवा, निवडक माहिती प्रसारण सेवा, सार सेवा, निर्देशन सेवा, संदर्भसेवा, सूचिकरण, भाषांतर, प्रलेख प्रदान, प्रतिलिपी, इंटरनेट आणि इतर संगणकीय सेवा संशोधन ग्रंथालयातून देण्यात येतात. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर पुणे, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणे. गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, पुणे. श्री. एकनाथ मंदिर, औरंगाबाद. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बँक मॅनेजमेंट, पुणे. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे. भारत साहित्य संशोधन संस्था, पुणे इ. विविध संशोधन संस्थेमध्ये संशोधन ग्रंथालय विविध विषयात संशोधन कार्य करून राष्ट्र विकासाच्या वाटचालीत महत्वपूर्ण भुमिका करतात.

ग्रंथालय राष्ट्र विकासाच्या वाटचालीत दीपस्तंभ म्हणून कार्य करतात. आयआयटी, सीएसआयआर, आयएसआरओ, आयआयऑफएस, आयएसआरओ, आयसीएआर, यासारख्या विशेष संस्था नव-नवीन शोध, नवे तंत्रज्ञान विकसित करून राष्ट्राला समृद्ध करीत आहेत.

**ग्रंथपाल**
**स्व प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालय,**
**अलिबाग**

आजकाल

# एसटी कर्मचाऱ्यांचा संप आणि राजकीय कुरघोडी

**तुषार गायकवाड**



४८ तास संप केल्यानंतर मुख्यमंत्र्यांच्या सोबत झालेल्या बैठकीनंतर एसटी कर्मचारी संघटनांनी संप मागे घेतला आहे. १,५०० ते २,५०० रुपये इतकी वेतनवाढ करण्याचे ठरवून संप मागे घेण्यात आला आहे. मात्र या संपाच्या आडून राजकीय कुरघोडी केली गेली आहे.

एसटी महामंडळाचे वाट्टोळं करणारे सदावर्ते व सदावर्ते प्रणित एसटी कर्मचारी संघटनेने संपाला विरोध केला. सत्तेचे घटक असलेले भाजपाचे विधान परिषद सदस्य गोपीचंद पडळकर आणि सदाभाऊ खोत यांनी संपात सहभाग घेतला. परिवहन मंत्रालय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. शिंदेना कात्रीत पकडण्याची ही फडणवीसी खेळी.

मग संपाच्या विरोधात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ औद्योगिक न्यायालयात गेले व याचिका दाखल केली. परिवहन मंत्री म्हणून एकनाथ शिंदे महामंडळाचे अध्यक्ष आहेत. या याचिकेवर न्यायालयात सुनावणी पार पडली. हा संप औद्योगिक न्यायालयाने बेकायदेशीर ठरवला. संपात सहभागी झालेल्या संघटना व कर्मचाऱ्यांना तातडीने कामावर रुजू होण्याचे आदेश दिले.

एखाद्या कर्मचाऱ्यास संपातून बाहेर पडण्यास संपात सहभागी कर्मचारी अगर संघटना अटकाव करत असेल तर त्याचेवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश न्यायालयाने स्थानिक एसटी प्रशासनाला दिले. कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करुन संपात सहभागी कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची तयारी सरकारने केली.

संपकरी एसटी कर्मचारी संघटना व मुख्यमंत्री यांच्या बैठकीत संपाला विरोध असणारे सदावर्ते सहभागी झाले. वेतनवाढीच्या आश्वासनावर संप मागे घेतला आहे.

ज्यांच्या पगारामध्ये २०२१ साली ५,००० रुपयांची वाढ झाली होती. त्यांच्या मूळ पगारामध्ये १,५०० रुपयांची वाढ झाली. ज्यांना ४,००० रुपयांची वाढ दिली होती, त्यांच्या पगारामध्ये २,५०० रुपयांची वाढ झाली. तर ज्यांना २,५०० वाढ झाली, त्यांच्या पगारात ४,००० रुपयांची वाढ देण्याचे ठरले आहे.

पण, पडळकर - सदावर्ते - खोत आणि सरकार समर्थक ६,५०० रुपयांची वाढ केली म्हणून गुलाल उधळत जल्लोष करत आहेत. एकनाथ शिंदे यांना अपयशी करण्याचा आणखी एक भाजपेयी डाव उधळला गेला आहे. ७ खासदार असलेले एकनाथ शिंदे एनडीए मध्ये फडणवीसांच्याही पेक्षा महत्त्वाचे आहेत याचे भान महाशक्तीला आहे, पण फडणवीसांना नाही. सरकारी बोळवणीवर एसटी कर्मचारी खूश असून उर्वरित मागण्या पदरात पाडून घेतील व एसटी महामंडळाचे खाजगीकरण करण्याचा डाव उधळतील अशी अपेक्षा ठेवू. कोरोना काळातील केंद्र व राज्य शासनाच्या लॉकडाऊन मधील एसटी बंदचा फटका महामंडळाला सुमारे ६, ००० कोटी रुपयांना बसला होता. त्यात एसटी कर्मचाऱ्यांनी आडमुठी भूमिका घेत, न्यायालयाने वकिलीची सनद काढून घेतलेल्या रेशीमबागी नरपुंगव सदावर्तेंच्या नादी लागून चक्काजाम संप केला. संपामुळे २५० आगारांमध्ये सुमारे १८, ५०० बस जागेवर थांबल्या. सरासरी एसटी महामंडळाचे एका दिवसाचे उत्पन्न २२ कोटी आहे. ४६ दिवस नाहक रखडलेल्या आंदोलनामुळे सुमारे १००० कोटी रुपयांचा फटका एसटी महामंडळाला बसला.

ज्यांचे ऐकून संप केला, त्यांनी राजकीय उद्देश साध्य होताच कोललंय. शिवाय एस टी कर्मचाऱ्यांच्या स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँकेच्या निवडणूकीत सदावर्तेंचे पॅनेल निवडून आले. संस्थेच्या सुमारे २,३०० कोटींच्या ठेवी आहेत. या पॅनेलकडून या ठेवींचा व्याजदर ७.५० टक्के करण्यात आला. सुमारे १५० कोटींच्या ठेवी कर्मचाऱ्यांनी दिवाळखोरीच्या भितीने काढून घेतल्या. ११ संचालकांनी सदावर्ते पॅनेलचा पाठिंबा काढून सवतासुभा मांडला. तोवर ६५ लाखांना सदावर्तेंच्या कडून चंदन लागले होते. सर्व नियम धाब्यावर बसवून घटनाबाह्य पध्दतीने सदावर्तेंने १३० कर्मचारी नियुक्ती केली होती.

मग राज्याच्या सहकार विभागास जाग आली. घटनाबाह्य पध्दतीने भरती केलेले १३० कर्मचारी सहकार आयुक्तांनी रद्द केले. बँकेच्या तज्ज्ञ संचालक पदावरुन सदावर्ते पती व पत्नीची हकालपट्टी केली. **(साभार)**

लोकसंसद

## लाडकी बहीण श्रेयवादावरून वाद

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेवरून राज्यभरात सत्ताधारी व विरोधक यामध्ये आरोप प्रत्यारोप होत आहेत असे वाद विवाद चालू असताना मंत्री मंडळ बैठकीत सुद्धा याचे पडसाद उमटल्याचे वृत्त नुकतेच वाचले. राष्ट्रवादी कॉंग्रेस गट मुख्यमंत्री लाडकी बहीण ऐवजी माझी लाडकी बहीण योजना हे नाव वापरत असल्याबद्दल शिवसेना सेना गटाने तीव्र आक्षेप मंत्रिमंडळ बैठकीत नोंदविला आहे. अलिकडे राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट कडून या योजनेचा प्रचार करताना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना असे न म्हणता माझी लाडकी बहीण योजना असे म्हटले जात आहे. मंत्री मंडळ बैठकीत यावर चर्चा सुद्धा झाली. या नाराजी नाट्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही खंत व्यक्त केली आहे . मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे नाव बदलणे हा चुकीचा प्रकार आहे आता निवडणुका जवळ आहेत त्याचा फटका बसू शकतो तसेच त्यामुळे विरोधकांमध्ये चुकीचा संदेश सुद्धा जाऊ शकतो. अशी भीती शिवसेनेच्या मंत्र्यांकडून व्यक्त करण्यात आली यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला व यापुढे सर्वच मंत्र्यांनी काळजी घ्यावी अशी सूचना केली आता विधानसभेच्या निवडणुका काही महिन्यावर येऊन ठेपल्या आहेत. महायुतीच्या नेत्यांना या योजनेमुळे सहानभूती मिळून सत्तेवर येऊ अशी आशा आहे आज महिलांमध्ये या लाडक्या बहिणी विषयी बरीच सहानुभूती आहे. त्याचा फायदा महायुतीला होऊ शकतो. **- शांताराम वाघ,** पुणे

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**७ सप्टेंबर**

**१९०५ :-** लेखक, 'स्फूर्ती' या मासिकाचे संपादक, विहार, विविधवृत्त साप्ताहिकाचे सहसंपादक, तसेच नवयुग, दै. चित्रा व लोकराज्य आणि नवाकाळचे सहसंपादक रघुनाथ गोविंद सरदेसाई यांचा जन्म. 'आमचा संवाद', 'ऑलिंपिक सामने', 'कागदी विमाने', 'खेळांचा राजा लॉंग टेनिस', 'खेळांच्या जन्मकथा भाग १,२', 'चलनी नाणी' हा लघुनिबंधी, 'महान क्रिकेट कर्णधार', 'सुरसुरी' हा विनोदी लेखसंग्रह 'स्वाती' हा कथासंग्रह अशी साहित्य संपदा. **१९१०:-** लेखक, पोर्तुगीज भाषेचे जाणकार जयवंतराव जगन्नाथ सरदेसाई यांचा जन्म. पेशाने वकील. विविध मासिकांतून १०० हून अधिक कथा प्रकाशित. 'गुलाब गेंद', 'अवशेष', 'सुखाचे क्षण' हे कथासंग्रह प्रसिध्द. **१९१४:-** अनुवादक, ग्रंथसंपादक आणि 'जनवाणी' या समाजवादी विचारसरणीच्या नियतकालिकाचे संपादक माधव गजानन बुध्दिसागर यांचा जन्म. 'मराठी सुनीत', 'प्राचीन मराठी गद्य', 'चिपळूणकर लेखसंग्रह' आदी ग्रंथ त्यांनी संपादित केले. **१९१६:-** लेखक-पत्रकार माधव पंढरीनाथ शिखरे यांचा जन्म. 'स्मृतीची चाळता पाने' आणि 'रोजनिशीतील पाने' हे त्यांनी संजय या टोपणनावाने केलेल्या वृत्तपत्रीय लेखनाचे संग्रह निघाले. तर 'अमेरिकन परराष्ट्र धोरण' आणि 'भारतीय संस्कृती' ही त्यांची अनुवादीत पुस्तके. **१९२१:-** नियतकालिकांतून कथा, काव्य, ललित लेखन करणाऱ्या लेखिका विजया दत्तात्रय शेवडे यांचा जन्म. 'पर्या (ओढा)' ह्या ललित लेखसंग्रहासह 'मोहळ', 'स्वप्नखुळी' हे काव्यसंग्रह आणि 'हौर (पूर)' ही दीर्घकथा प्रसिध्द. **१९२७:-** 'मराठी भाषेची घटना', 'अलंकार विवेक', 'बालबोध व्याकरण', 'मराठी पद्य वाचन' आदी भाषाभ्यासाची तर 'लग्नविधी आणि सोहळे', 'धर्म आणि नीतीपर व्याख्याने' ही समाजविषयक पुस्तके लिहिणारे रामचंद्र भिकाजी जोशी यांचे निधन. **१९३५:-** इतिहास संशोधक डॉ. भा. रा. अंधार यांचा जन्म. **१९४०:-** लघुअ नियतकालिकांच्या इतिहासातील एक महत्त्वाचे कवी, कादंबरीकार चंद्रकांत गणपत खोत यांचा जन्म. 'अबकडई' हे त्यांनी चालवले अनियतकालिक 'बिनधास्त', 'उभयान्वयी', 'अव्यय', 'दुरेघी' या कादंबऱ्या तर 'बिंबप्रतिबिंब' ही स्वामी विवेकानंद, 'दोन डोळे शेजारी' ही रामकृष्ण परमहंस आणि 'संन्याशाची सावली' हा माँ शारदा यांच्यावर बेतलेल्या कादंबरीसह 'मार्तिक', 'अपभ्रंश' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रसिध्द. **१९४०:-** लेखक हरदास सूर्यभान भगत यांचा जन्म. त्यांच्या ग्रंथसंपदेत 'नामांतर प्रशन', 'बुध्ददर्शन', 'वादळवारा', 'सुकाणू', 'कानपिळी', 'बावीस प्रतिज्ञा', 'काळाची गरज' अशी ग्रंथ संपदा. **१९४३:-** लेखक, वक्ते, बालसाहित्यिक प्रभाकर अनंत पुराणिक यांचा जन्म. 'चतुर कुंभार', 'चतुर राजकुमारी', 'मामा पळाले धुम्म' हे बालसाहित्य आणि दिवाळी अंकातून लेखन तसेच आकाशवाणीवरुन कथा, काव्य वाचनाचे कार्यक्रम सादर केले आहेत. **१९४८:-** साहित्यिक नंदकुमार गोपाळ रोपळेकर यांचा जन्म. विविध विषयांवर वैचारिक पत्रलेखन, लेख, मुलाखती, स्तंभलेखन, साक्षेपी समीक्षा, विनोदी लेखन आदी लेखांद्वारे सातत्यपूर्ण समाजस्पर्शी प्रबोधनात्मक लेखन केले. याशिवाय 'अजबसिंगाची करामत', 'वेध पर्यावरणाचा', 'साहित्य कौस्तुभ-समीक्षात्मक लेखसंग्रह', 'प्रनोत्तररुपी पर्यावरण', 'इटुकल्या पिटुकल्या गोष्टी' या ध्वनिफितीचे लेखन, मुंबई आकाशवाणीवर विविध विषयांवर प्रासंगिक लेखन, चर्चात्मक संवाद, मुलाखती वगैरे. शंभरएक नामांकित तज्ज्ञांच्या मुलाखती प्रकाशित. **१९५२:-** कवी नामदेव गणपती कानेकर यांचा जन्म. ह्यांचे रसिकरंजन 'गोड गीतमाला' आणि 'परिवर्तन वेधफ हे त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. **१९५३:-** लेखक-पत्रकार रमाकांत यशवंत वेल्हे यांचे निधन. 'रात्रीच्या रम्यकथा', 'जीवन' ह्या मासिकासह 'स्वदेश' नामक द्विसाप्ताहिक त्यांनी काही काळ चालवले. **१९५८:-** लेखक, पत्रकार, संपादक, एकांकिकाकार जयकृष्ण बावनकुळे यांचा जन्म. 'एक होता म्हातारा', 'जैसी ज्याची करणी', 'धर्म यांचे झाले मढे', 'अखेरचा निर्णय' आणि 'कठीण समय येता' ह्या एकांकिका त्यांच्या नावावर आहेत. तसेच संपादित ग्रंथ त्यांच्या नावावर आढळतात.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

# जमीन मोजणीला ग्रामस्थांचा विरोध

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील जसखार ग्रामपंचायत हद्दीत अधिकृत व अनधिकृत बांधकामाचा विषय कळीचा मुद्दा बनला आहे. अधिकृत बांधकाम कोणते व अनधिकृत बांधकाम कोणते यावरून जसखार गावात द्वेषाचे राजकारण पाहायला मिळत आहे. समोरच्याने



गाय मारली म्हणून आपण वासरु मारणे अशा म्हणीप्रमाणे विरुद्ध सदस्यांवर याचिकाकरुन गावाचे भविष्य धोक्यात घालू इच्छित नाही. याबाबीवर व निकालावर जसखारवासियांनी चिंता व चिंतन करावे, असे विचार काशिबाई ठाकूर यांनी व्यक्त केले होते. मात्र, त्यांच्यावरच आता चिंतन करण्याची वेळ आली आहे. त्याच आता या म्हणी प्रमाणे वागत असल्याचा आरोप युवा सामाजिक संस्थेने व ग्रामस्थांनी केला आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**७ सप्टेंबर**

१) श्रीम. विश्वनाथ कृष्ण डोंगरे
अलिबाग, ७-९-१९५०

२) श्रीम. लिलावती एकनाथ म्हात्रे
अलिबाग, ७-९-१९५४

३) श्री. शिरीष पद्माकर लेले
अलिबाग, ७-९-१९५४

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

**Bhartiya Education Society's**

## Institute of Pharmacy

DTE Code: 3298

**Approved by Pharmacy Council of India & Govt. of Maharashtra, Affiliated to DBATU**

At. Velshet (Nagothane), Post. Pigonde, Tal. Roha, Dist-Raigad, Pin - 402106.
Mob. 8830313263/ 8850500759/E-mail : besvspcy@gmail.com

## ADMISSION NOTIFICATION 2024-25

(For Institute Level Seats and Seats Vacant after CAP Round if any)

Application are invited from eligible candidates for admission to the Direct Second Year B.Pharmacy Course for Institute level and seats vacant after CAP round if any)

| DTE choice code | Course offered | Eligibility |
|---|---|---|
| 329882310 | Direct Second Year B. Pharmacy (DSP) | Passed Diploma in Pharmacy |

Note: Application forms for Institute level can be obtained from and submitted to the college office on all working days between 04/09/2024 to 10/09/2024. Kindly refer institute website (www.besiop.ac.in) and college notice for the detail of admission schedule and detailed eligibility criteria.

Principal

## पाली भुतवली लघु पाटबंधारे योजना
## कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्र. २ ( बां),
## जाहीर नोटीस

क्रमांक:- उविअ/भूसं./कात-१/पा.भु.ल.पा.योजना/ डिकसळ रस्ता/जा. नो./२०२४,
दिनांक ०५/०९/२०२४

ज्याअर्थी पाली भुतवली लघु पाटबंधारे योजना मौजे डिकसळ गावातुन पल्याण धरणाकडे जाणारा पोहोच रस्त्यासाठी मौजे डिकसळ ता. कर्जत जि.रायगड येथील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी करणेबाबत शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. संकिर्ण-०३/२०१५ प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ पाली भुतवली लघु पाटबंधारे प्रकल्पासाठी दिनांक ०६ डिसेंबर २०१६ मधील तरतुदी अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्र. २ (बां) कोकण भवन नवी मुंबई यांचेद्वारे व यांचे नाव घेणेबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

आणि त्याअर्थी, जिल्हाधिकारी रायगड यांचे आदेश क्र.भूसंपादन/टे-६/२१५६२८० /मौजे डिकसळ/२०२४ दिनांक २४/०७/२०२४ अन्वये उक्त प्रस्तावासंबधी शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि तद्नुषंगिक शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एल. क्यू. एन. ०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ व शासन शुद्धीपत्रक दिनांक २७ नोव्हेंबर २०१७ अन्वये कार्यवाही करणेची आहे. त्या अर्थी आता,

आणि त्याअर्थी, जिल्हाधिकारी रायगड यांचे आदेश क्र. भूसंपादन/टे-६/२१५६२८० /मौजे डिकसळ/२०२४ दिनांक २४/०७/२०२४ अन्वये उक्त प्रस्तावासंबधी शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि तद्नुषंगिक शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एल. क्यू. एन. ०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ व शासन शुद्धीपत्रक दिनांक २७ नोव्हेंबर २०१७ अन्वये कार्यवाही करणेची आहे. त्या अर्थी आता,

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी श्री. प्रकाश संकपाळ, ''उपविभागीय अधिकारी कर्जत याद्वारे,

अ. अनुसुची- एक मध्ये नमुद खाजगी क्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्रमांक ०२ (बां), कोकण भवन, नवी मुंबई यांच्याद्वारे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे.

ब. प्रकल्पासाठी जमिन थेट खरेदी करताना जिल्हा स्तरीय समिती मार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या शेड्यूल-१ च्या तरतुदीनुसार संपादित जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५% रक्कम वाढीव देवून, मोबदला निश्चित करण्यात येईल.

क. संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणांप्रमाणे खाजगी वाटाघाटीद्वारे कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्रमांक ०२ (बां), कोकण भवन, नवी मुंबई यांचेद्वारे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतचे संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे. २. संबधित भूधारकांनी हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) उपविभागीय अधिकारी कर्जत यांचेकडे दाखल करावीत.

३. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना उपविभागीय अधिकारी कर्जत यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत भुधारकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.'

४. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखडयाची प्रत उपविभागीय अधिकारी कर्जत यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबधित व्यक्तींना तसेच जनतेस निरिक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**तालुका :- कर्जत** **जिल्हा : रायगड**

| अ.क्र. | गावाचे नाव | स.नं./हि.नं./ग्रा.पं./ घर/ मालमत्ता क्रमांक | | क्षेत्र हे.आर./पो.ख. | खरेदी करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १. | डिकसळ | १५ | १८ /ब/ २ | ०.२००० | ०.१२३० |
| २. | डिकसळ | १५ | १८/१/अ | ०.५००० | ०.१२०० |
| ३. | डिकसळ | ११ | १/अ/१ | ०.१२०० | ०.०८१० |
| ४. | डिकसळ | ९ | २/अ/३ | ०.१३०० | ०.०३४० |
| ५. | डिकसळ | ९ | ब/८ | ०.०४३० | ०.०४३० |
| ६. | डिकसळ | ९ | ब/३ | ०.०२७० | ०.०२७० |
| | | | एकुण | १.०२०० | ०.४२८० |

दिनांक : ०५/०९/२०२४
ठिकाण : कर्जत
क्र. जिमाका/राअ/जाहि/८०/२०२४-२५

सही/-
**(प्रकाश संकपाळ)**
सक्षम प्राधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी कर्जत

## शासकीय तंत्रनिकेतन पेण
## रामवाडी शिवाजीनगर पेण, जि. रायगड.
(०२१४३-२९११८८)
e-mail: office.gppen@dtemaharashtra.gov.in
principal.gppen@dtemaharashtra.gov.in

**प्रथम व थेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठीची संस्थास्तरीय समुपदेशन फेरी**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्रथम व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत व संस्थास्तरीय समुपदेशन प्रवेश फेरी क्र. १ नंतर शासकीय तंत्रनिकेतन, पेण येथे रिक्त राहणाऱ्या जागा संस्थास्तरावर भरणेकरिता माहिती पुस्तिका पदविका प्रवेश २०२४-२५ नियम क्रमांक १३ अन्वये अतिरिक्त समुपदेशन फेरी क्र. २ व ३ शासकीय तंत्रनिकेतन, पेण या संस्थेत अनुक्रमे ९/९/२०२४ व १०/९/२०२४ या दोन्ही दिवशी सकाळी १०:०० वाजल्यापासून सुरु करण्यात येणार आहे. तदनंतरही जागा रिक्त झाल्यास थेट द्वितीय वर्ष पदविका प्रवेशाकरिताची संस्थास्तरावरची अंतिम फेरी दि. १३/०९/२०२४ रोजी घेण्यात येणार आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी सर्व मुळ कागदपत्रे व आवश्यक शुल्काची रक्कम घेवुन संस्थेत ठीक १० वाजता उपस्थित रहावे.

**(डॉ. नितिन ग. कुलकर्णी)**
प्र. प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, पेण

## जाहीर सुचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मोजे बामणगाव, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद वर्णनाची शेत जमिन मिळकत श्री. राजेंद्र जनार्दन पाटील व सौ. दर्शना राजेंद्र पाटील, राहणार पंतनगर, अलिबाग यांच्या खुद मालकीची असून, सदरील शेतजमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झालेला आहे. सदर शेतजमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून चौदा (१४) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन

| मौजे | गट नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| बामणगाव ता. अलिबाग, | ८२ | ० | ०-५६-०० <br> ०-११-६० पो.ख. <br> ०-६७-७० एकूण | ८.२५ |

सदरील मिळकतीपैकी ०-३३-८० (हे. आर) शेतजमिन मिळकत.

अलिबाग
दिनांक ०७/०९/२०२४

सही/-
**(ॲड. निवास ना. पाटील )**
श्री क्षेत्र, सहाण,
ता. अलिबाग, जि. रायगड.
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक जितेश्री समिर चौगुले, रा. कृष्णा प्लाझा, वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे खांडपोली, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| ७३५ | १-०२-०० | ०.२४ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक ०७/०९/२०२४

सही/-
**समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९४०३३०५२५०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेल्या मिळकती आमचे अशिल रेणुका ग्वालीओरकर रा. ए/२०३, अशोका रेसीडेन्सी, प्लॉट नं. ३, शिल्प चौक जवळ, सेक्टर-१२ खारघर, जि. रायगड-४१०२१० यांनी कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे भातगांव, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.**

| जमीन मालक | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र हे.आर | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. प्रकाश धोंडू बेंडे | ३४ | ४ | ०.०४.३० | ०.३४ |
| | ३४ | ५ | ०.०६.१० | ०.३७ |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युपत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतींच्या खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत, कळावे.
तारीख:- ०७/०९/२०२४

**ॲड. कल्याणी रवी गायकर**
पत्ता- प्रेमसिंधु अपार्टमेंट,
कोतवालनगर-कर्जत, जि. रायगड
मो.नं. ८४४६१४८७८१

दिनांक : ०७ सप्टेंबर २०२४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे उंबरविरा, ता. खालापुर, जि. रायगड येथील जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.-आर.- पॉ. | रुपये | पैसे |
| प्रविण पांचाभाई पटेल | १ | ९/ब | ००-२४-०० | १ | ९५ |
| | १ | ९/ड | ००-७३-०० | ४ | ३० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- २०३ व २०४, दुसरा मजला, साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक (अंबिका नाका), पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

सही/-
**अल्पेश अनंत कराळे**
(ॲडव्होकेट)
दिनांक : ०७/०९/२०२४
मो.नं. ९९२२३६८१२१

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
रायगड विभाग, पेण.

## निविदा सुचना क्रमांक ०४ सन २०२४-२५

विभागीय अभियंताम.रा. मा. प. महामंडळ रायगड विभाग पेण हे कोणत्याही शासकीय संस्थेचे, उदा सार्वजनिक बांधकाम, म्हाडा इत्यादीयांचे कडील नोंदणीकृत ठेकेदारांकडून अथवा अ नोदंणीकृत परंतू स्थापत्य कांमाचा अनुभव असलेल्या ठेकेदारकडून मोहोर बंद निविदा मागवित आहेत. निविदा संच खरेदी करतेवेळी आयकर प्रमाणपत्र सॉल्व्हंसी नोंदणी प्रमाणपत्र पॅन कार्ड, भागीदारी संदर्भात कागदपत्रे गेल्या तीन वर्षामध्ये केलेल्या कामाच्या अनूभवाचे दाखले व मशिनरी बाबतचे दाखले तसेच जिएसटी नोंदणी दाखला, कामगार विमा दाखला इत्यादी कागद पत्रांच्या छायंकीत व मुळप्रती सादर करने आवश्यक आहे. तसेच खुलासेवार तपशील व निविदा सूचना कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची निविदा रक्कम जी.एस.टीवरहीत | कामाची अनामत रक्कम 1 टक्केप्रमाणे | सुरक्षाठेवीची रक्कम 4 टक्केप्रमाणे | को-या निविदा संचाची रक्कम जीएसटीसह |
|---|---|---|---|---|---|
| १ | रा.प महाड.आगारातील महिला विश्रांती गृहाची दुरुस्ती करने | ३०१५५२.२३ | ३०१६.०० | १२०६२.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| २ | अलिबाग आगारातील मंदीराजवळील चालक/वाहक विश्रांतीगाचे नुतनीकरण करने | ३२०७१९.४६ | ३२०७.०० | १२८२९.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ३ | विभा.कार्याशाळेतील छतावरील टाकीस आय. एस. एम. बी सपोर्ट, वॉटर प्रुफिंग,प्लास्टरींग इ.दुरुस्ती करने | ६७८८१५.४६ | ६७८८.०० | २७१५३.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ४ | रा.प माणंगाव आगारा मधील स्लॅब वरील छतावर पत्र्याची शेड तयार करने | २७७५४७.३२ | २७७५.०० | ११102.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ५ | रोहा आगारातील शॉप वरील छताचे पत्र बदलणे दालनाचे रंगकाम करने | ८३३४७२.०० | ८३३५.०० | ३३३३९.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ६ | मुरुड आगारातील वॉशिगं रॅम्प जवळील भागात सिमेंट कॉक्रीटीकरन करणे | ८०१७९१.७४ | ८०१८.०० | ३२०७२.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ७ | रा.प.माणंगाव आगारातील वॉशीगं रॅम्प लगत,कठडा तसेच पाणीपूरवठा लाईन करने | २३५४६०.५० | २३५५.०० | ९४१८.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ८ | रा.प मुरुड आगारातील कर्मचारी प्रसाधनगृहाचा दुरुस्ती व रंगकाम करने | २९५०८०.१८ | २९५१.०० | ११८०३.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ९ | रा.प.रोहा आगारातील वॉशिगं रॅम्प जवळील भागास कॉक्रीटीकरण करने | ७९७०५९.७४ | ७९७१.०० | ३१८८२.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| १० | रा.प कार्याशाळेतील टी. ओ. बी शाखेची दुरुस्ती करने | ४९६००७.३७ | ४९६०.०० | १९८४०.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ११ | महाड बसस्थानकातील चालक/वाहक विश्रांतीगृहास खिडक्या,दरवाजे दूरूस्ती करून रंगकाम करने | ४०७३०८.३३ | ४०७३.०० | १६२९२.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| १२ | रा.प महाड बसस्थानाकतील फलाट क्र.5 व फलाट क्र.07 ची दुरुस्ती करने | २०४००७.८६ | २०४०.०० | ८१६०.३१ | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| १३ | रा.प रोहा बसस्थानकावरील स्लॅब वरील छतावर पत्र्याची शेड तयार करने | ७३८५८०.२४ | ७३८६.०० | २९५४४.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |

क) कोरे निविदा संच मिळण्याचा कालावधीः-

कोरी निविदा पत्रिका देण्याची तारिख - .दि.०९.०९.२०२४ ते १३.०९.२०२४ पर्यंत सुटया सोडून सोमवार ते शुक्रवार दुपारी १४.०० वा पर्यंत व शनिवार दु.१२.०० वाजेपर्यंत

निविदा सादर शेवट ची तारीख- दि. १३.०९.२०२४ वेळ -१५:०० वा. पर्यंत
निविदा पत्रिका उघडण्याची तारीख - दि. १७.०९.२०२४ वेळ -१६:०० वा. पर्यंत ( शक्य असल्यास )
कामपुर्ण करण्याची मुदत- काम क्रं, १ ते १३ कामाकरीता - ६० दिवस

टीप :-
१. कोणतीही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार महामंडळाने आपल्याकडे राखुन ठेवला आहे.

विभागिय अभियंता
राज्य परिवहन रायगड विभाग,
पेण.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. हरिश्चंद्र सोपान जाधव रा. भाऊचा तांडा, शेलगाव परभणी यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वाकणगाव, ता. सुधागड, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| ११२/ब | १-७२-०० | ०.५६ |

पैकी मिळकत मालकाचे क्षेत्र १-४२-० हे.आर.पैकी ०-२४-० हे.आर.

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ०७/०९/२०२४

सही/-
**समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९४०३३०५२५०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली मौजे खंडाळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची घर मिळकत श्री. अविनाश विश्वनाथ नाईक, रा. तळवली, पो. खंडाळे, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी सदर मिळकतीचे पूर्वगामी मालक श्री. गिरीधर धुमा पुजारी यांचेकडून खरेदी केलेली असून सदरची मिळकत श्री. गिरीधर धुमा पुजारी यांनी सदर मिळकतीच्या पूर्वगामी मालक सौ. मनिषा मंगेश पानसरे यांचेकडून खरेदी केलेली आहे. सदरची मिळकत आमचे अशिलांनी श्री. अविनाश विश्वनाथ नाईक व श्री. गिरीधर धुमा पुजारी यांचेकडून खरेदी करण्याचा निर्णय घेतलेला आहे त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | मालमत्ता क्र. | क्षेत्रफळ चौ.फू./चौ.मी. | वर्णन |
|---|---|---|---|
| खंडाळे, ग्रुप ग्रामपंचायत खंडाळे ता. अलिबाग जि. रायगड | २८३ | ६६० चौ.फूट <br> ६१.३३ चौ.मी | पक्के सिमेंट पत्रे |

वर नमूद मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट, ताबा, बयाणा पावती, रजिस्टर्ड अगर अनरजिस्टर्ड साठेकरार, फरोक्तखत/खरेदीखत, गहाण, दान, बोजा, बक्षीस, मृत्यूपत्र, भाडेपट्टा, जप्ती, लीज, लियन, अन्नवस्त्र-पोटगी, वारसाहक्क, जाणे येणेचा मार्ग अथवा अन्य प्रकारचा कोणताही कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांच्या आत त्यासंबंधातील लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे त्यांचे नमूद पत्त्यावर कळवावी.

या नोटीसमध्ये नमूद केलेल्या मुदतीत कोणीही कसल्याही प्रकारची हरकत लेखी स्वरूपात न कळविल्यास सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजून तसेच सदर मिळकतीशी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे, असे समजून आमचे अशिल वरील वर्णनाच्या मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व सदरच्या व्यवहारानंतर कोणीही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे, असे समजून आमचे अशिल वरील वर्णनाच्या मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व सदरच्या व्यवहारानंतर कोणीही कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : ०६/०९/२०२४

सही/-
**ॲड. जयवंत ह. घरत**
एम.ए; एल.एल.एम.
बी/१०२, 'चित्रा-तारांगण' महर्षी कर्वे रोड,
बँक ऑफ महाराष्ट्र समोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड

# कपिल परमारला कांस्य

## ■ पॅरालिम्पिकच्या इतिहासात ज्युदोमध्ये भारताचे पहिलेच पदक

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

**पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारतीय खेळाडूंनी आपल्या चांगल्या कामगिरीत सातत्य ठेवले आहे. दरम्यान आता कपिल परमारने १ ६० किलो पॅरा ज्युदो स्पर्धेमध्ये कांस्यपदक जिंकले. गुरुवारी (दि.५) रोजी झालेल्या कांस्यपदकाच्या लढतीत कपिलने ब्राझीलच्या एलिटन डी ऑलिव्हेराचा एकतर्फी १०-० असा पराभव केला. पॅरालिम्पिकच्या इतिहासात ज्युदोमध्ये भारताचे हे पहिले पदक ठरले.**

दृष्टीदोष असलेले किंवा कमी दृष्टी असलेले खेळाडू पॅरा ज्युडोमध्ये १ प्रकारात भाग घेतात. कपिलच्या कांस्यपदकासह पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारताच्या पदकांची संख्या आता २५ वर पोहोचली आहे. भारताने आतापर्यंत ५ सुवर्ण, ८ रौप्य आणि १२ कांस्य पदके जिंकली आहेत. २०२२ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत परमारने याच प्रकारात रौप्य पदक जिंकले होते.कपिल परमारने उपांत्यपूर्व फेरीत व्हेनेझुएलाच्या मार्को डेनिस ब्लँकोचा १०-० असा पराभव केला होता. मात्र उपांत्य फेरीत त्याला इराणच्या एस. बनिताबा खोर्रम आबादीचा ०-१० असा पराभव केला. या न्यात परमारला एक पिवळे मिळाले. फेरीतील दोन्ही साम प्रत्येकी कार्ड उपांत्य पराभवाने परमारचे सुवर्णपदक जिंकण्याचे स्वप्न निश्चितच भंगले. पण आता त्याने कांस्यपदक जिंकून नवा इतिहास रचला.दुसरीकडे महिलांच्या ४८ किलो २ गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या कोकिलाला कझाकिस्तानच्या अकमारल नौटबेकविरुद्ध ०-१० असा पराभव स्वीकारावा लागला.

त्यानंतर रेपेचेज-ए च्या २ फायनलमध्ये कोकिला युक्रेनच्या युलिया इव्हानित्स्काकडून ०-१० ने हरली. यामध्ये तिला तीन पिवळे कार्ड मिळाले तर त्याच्या प्रतिस्पर्ध्याला दोन पिवळे कार्ड मिळाले. ज्युडोमध्ये किरकोळ उल्लंघनासाठी पिवळे कार्ड दिले जाते. आंशिक दृष्टी असलेले खेळाडू २ प्रकारात भाग घेतात.



# ‘मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने’च्या लाभार्थ्यांसाठी विशेष शिबीर

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ६० वर्षांवरील नागरिकांना ‘मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने’चा लाभ देण्याकरिता सोमवारी (दि.९) आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याठिकाणी लाभार्थ्यांच्या नोंदणी सहित वैद्यकिय प्रमाणपत्रासाठी आरोग्य तपासणीची सुविधादेखील देण्यात येणार आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त ज्येष्ठ नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने आयुक्तांनी केले आहे.



ज्येष्ठांना तीर्थक्षेत्राची मोफत यात्रा करण्यासाठी ‘मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने’ ची घोषणा केली आहे. या योजनेअंतर्गत प्रवास खर्चाची कमाल मर्यादा प्रती व्यक्ती ३० हजार इतकी राहणार आहे. पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ज्येष्ठ नागरिकांना या योजनेचा लाभ देण्यासाठी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जासोबत, ज्येष्ठ नागरिकांना सरकारी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पूर्ण आरोग्य तपासणी केल्यानंतर ती व्यक्ती शारीरिकदृष्ट्या निरोगी आणि प्रस्तावित प्रवासासाठी सक्षम असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेणार आहे. या प्रमाणपत्रासाठी महापालिकेच्यावतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणीची सोयदेखील नाट्यगृहात करण्यात आली आहे. जास्तीत जास्त ज्येष्ठ नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

# आरडीसीसीकडून प्रशिक्षणार्थींना नियुक्ती पत्र

## ■ माजी आ. जयंत पाटील, जिल्हा उपनिबंधक प्रमोद जगताप यांची उपस्थिती

**। अलिबाग । वार्ताहर ।**

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण आणि नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे राबविली जात आहे. त्याची सुरूवात रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने करण्यात आलेली आहे. बुधवारी (दि. ४) अलिबाग येथील बँकेच्या केंद्र कार्यालयात बँकेचे चेअरमन, माजी आमदार जयंत पाटील आणि रायगड जिल्हा सहकारी संस्थेचे उपनिबंधक प्रमोद जगताप यांच्या वतीने या युवा प्रशिक्षणार्थींना नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले.

यावेळी बँकेचे उपाध्यक्ष सुरेश खैरे, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कमलाकर वाघमोडे हे उपस्थित होते. यावेळी रायगड जिल्ह्यातून नोंदणी केलेल्या ५३ जणांपैकी मनाली गायकर, दिप्ती पाटील, ऋत्विक नागवेकर, प्रियांका पिंगळा, जाई खटावकर, अपेक्षा शेळके, दिपाली पयेर, ओमकार सुर्वे, सुमित दवंडे, सुमित निवाते, सौरभ मोरे, देवेश चांढवेकर, योगेश ढेपे, नेहा पाटील, श्वेता वैद्य यांना नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले.

नोंदणी करणाऱ्यांची शैक्षणिक गुणवत्ता तसेच कामकाजासाठी आवश्यक मनुष्यबळ याची सांगड घालून



या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणार्थी म्हणून पुढील सहा महिने बँकेमध्ये काम करण्याची संधी प्राप्त होणार आहे. रायगड जिल्हा मध्य. सहकारी बँक ही राज्यातीलच नव्हे तर, देशातील सर्वोत्तम सहकारी बँक म्हणून लोकप्रिय असून, येथील कामकाजाचा अनुभव या प्रशिक्षणार्थींना अधिक लाभदायक ठरेल, असे प्रतिपादन बँकेचे चेअरमन जयंत पाटील यांनी केले.

तसेच बँकेच्या वतीने नुकत्याच झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये ६००० कोटींच्या व्यवसायाचे लक्ष बँक पूर्ण करणार असून, या माध्यमातून प्रशिक्षणार्थ्यांना बँकेच्या व्यापक विस्ताराची तसेच व्यवसाय भरारीची स्वतंत्र माहिती करून घेता येणार आहे. याकरिता अधिक मेहनतीने आणि उत्साहाने हे प्रशिक्षण पूर्ण करावे, असे आवाहन जयंत पाटील यांनी केले आणि सर्व प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा दिल्या.

या योजनेंतर्गत रोजगार इच्छुक उमेदवार आणि रोजगार उपलब्ध करून देणारे उद्योजक यांना एकत्रित जोडण्याकरिता शासनाच्या वतीने संकेत स्थळ तयार करण्यात आलेले असून, त्याच्यावर झालेल्या नोंदणीप्रमाणे या प्रशिक्षणार्थींना नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आलेले आहे.

रोजगार इच्छुक उमेदवारांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव प्रशिक्षणातून मिळून त्यांची क्षमतावाढ होण्याच्या दृष्टीकोनातून तसेच उद्योजकांना त्यांच्या उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ कार्य प्रशिक्षण योजनेद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या माध्यमातून प्रशिक्षणार्थींना बारावी रू. ६,०००, आयटीआय/पदविका रू. ८,००० आणि पदवीधर, पदव्युत्तर यांना रू. १०,००० प्रतिमहा वेतन सहाय्य मिळणार आहे.




# मुशीर खानचे दुलीप ट्रॉफीमध्ये शतक

**। बंगळुरू । वृत्तसंस्था ।**

दुलीप ट्रॉफीला ५ सप्टेंबरपासून म्हणजेच गुरुवारपासून सुरुवात झाली आहे. बंगळुरू येथील एम चिन्नास्वामी स्टेडियमवर भारत अ आणि भारत ब यांच्यात सामना खेळला जात आहे. भारत ब संघाचा कर्णधार अभिमन्यू इसवरन आहे. मुंबईकडून क्रिकेट खेळणारे दोन भाऊ सरफराज खान आणि मुशीर खान भारत ब संघाकडून खेळत आहे. मुशीर खानने पुन्हा एकदा आपली उत्कृष्ट कामगिरी करत दमदार शतक झळकावले. जिथे एकीकडे इतर फलंदाज धावा करण्यासाठी धडपडत होते, तिथे मुशीर खानने शतक झळकावले आहे.



दुलीप ट्रॉफी सामन्यात भारत अ संघाचा कर्णधार शुभमन गिलने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सामन्याच्या पहिल्या दिवसाच्या पहिल्या दोन सत्रात भारत अ संघाच्या गोलंदाजांनी वर्चस्व गाजवले, तर दिवसाच्या शेवटच्या सत्रात १९ वर्षीय मुशीर खानने आपल्या शतकाने सर्वांची मने जिंकली. दिवसाच्या पहिल्याच सत्रात मुशीर फलंदाजीसाठी मैदानात आला आणि त्यानंतर त्याने एका टोकाला पाय रोवून उभा राहत संघाच्या धावांची जबाबदारी घेतली, त्यानंतर त्याने २०४ चेंडूत आपले शतक पूर्ण केले.

१९ वर्षीय मुशीर खान तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आला. मुशीरने संयम दाखवत चांगली फलंदाजी केली. मुशीर खानने २०५ चेंडूत १० चौकार आणि २ षटकारांसह शतक पूर्ण केले. यानंतरही तो अजूनही मैदानात कायम आहे. मुशीर देशांतर्गत क्रिकेटमध्ये आपल्या फलंदाजीने सर्वांना प्रभावित करत आहे.

खानच्या बॅटने अंडर-१९ वर्ल्ड कपमध्येही चांगली कामगिरी केली होती. मुशीर खानने आवेश खान, कुलदीप यादव, आकाशदीप, खलील अहमद, शिवम दुबे आणि तनुष कोटियन यांच्याविरुद्ध फलंदाजी केली. या ६ गोलंदाजांपैकी ५ गोलंदाज आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळले आहेत.




## राठोड न्युझीलंडचे फलंदाजी प्रशिक्षक

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

९ सप्टेंबरपासून अफगाणिस्तान आणिन्यूझीलंडयांच्यातकसोटीसामना खेळवला जाणार आहे. यासाठी न्यूझीलंडचा संघ भारतात पोहोचला आहे. अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्यापूर्वी संघाने मोठा उलटफेरकेलाआहे. यासामन्यासाठी न्यूझीलंडने विक्रम राठोड यांची फलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. विक्रम राठोड यांचा यापूर्वी राहुल द्रविडच्या कोचिंग स्टाफमध्ये समावेश होता आणि त्यांनी टीम इंडियासाठी फलंदाजी प्रशिक्षक म्हणून काम केले होते. श्रीलंकेचा महान गोलंदाज रंगना हेराथ संघात फिरकी गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून सामील होणार आहे. विक्रम राठोडने भारतासाठी ६ कसोटी सामने खेळले आहेत. याशिवाय तो २०१२ मध्ये टीम इंडियाचा सिलेक्टरही होता. तो राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमधील राहुल द्रविडच्या कोचिंग स्टाफचा एक भाग होता. २०१९ मध्ये बीसीसीआयने त्यांना भारताच्या फलंदाजी प्रशिक्षकाची जबाबदारी दिली. राठोडने भारताला २०२४ चा टी विश्वचषक जिंकून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.






# स्पीड स्केटिंग आणि बिॲथलॉन

गेम टाईम



२०१८ च्या विंटर ऑलिम्पिकमध्ये स्पीड स्केटिंग या खेळाचा समावेश होता. फिगर स्केटिंगपेक्षा हा प्रकार पूर्णपणे वेगळा आहे. या खेळातल्या खेळाडूंची गतीशी स्पर्धा असते. जास्तीत जास्त गुण मिळवण्यापेक्षा अधिकाधिक गती कशी राखता येईल यावर त्यांचा भर असतो. लंबगोल ट्रॅकवर स्पीड स्केटिंग स्पर्धेचं आयोजन केलं जातं. नावाप्रमाणेच या खेळात वेगाला प्रचंड महत्त्व आहे. स्पीड स्केटिंगची तीन विभागांमध्ये विभागणी केलेली असते. शॉर्ट ट्रॅक, लाँग ट्रॅक आणि मॅरेथॉन स्पीड स्केटिंग असे हे प्रकार आहेत. नेदरलँड, नॉर्वे आणि दक्षिण कोरियामध्ये हा खेळ खूप लोकप्रिय आहे. १९९२ पासून ऑलिम्पिकमध्ये शॉर्ट ट्रॅक स्पीड ट्रेकिंगचा समावेश करण्यात आला.

बिॲथलॉन हादेखील विंटर ऑलिम्पिकमधला एक लोकप्रिय खेळ आहे. स्कीईंग आणि शूटिंग या दोन खेळांचं मिश्रण म्हणजे बिॲथलॉन. हे दोन्ही खेळ एकमेकांपेक्षा खूपच वेगळे आहेत. सुरूवातीला स्कीइंगची स्पर्धा आयोजित केली जाते. स्कीईंग करून विशिष्ट अंतर कापल्यानंतर स्पर्धकांना शूटिंग म्हणजे नेमबाजीसाठी उभं रहावं लागतं. १९६० च्या विंटर ऑलिम्पिकमध्ये बिॲथलॉनचा सर्वप्रथम समावेश करण्यात आला होता. १९९२ च्या विंटर ऑलिम्पिकपासून महिलांच्या बिॲथलॉनला सुरूवात झाली. बिॲथलॉनआधी विंटर ऑलिम्पिकमध्ये मिलिट्री पेट्रोल या इव्हेंटचा समावेश केला जात असे. १९२४,१९२८,१९३६ आणि १९४८ अशा चार ऑलिम्पिकमध्ये हा खेळ खेळण्यात आला होता. मात्र केवळ १९२४ मध्ये विजेत्यांना पदकं देण्यात आली. त्यानंतर हा खेळ फक्त सादरीकरणापुरताच मर्यादित राहिला.

# सुजलाम सुफलाम बांग्लादेश

सफर देशांची



बांग्लादेश हा भारताचा शेजारी देश आहे. या रुपाने पूर्वी पाकिस्तानचा भाग असणाऱ्या बंगाली भाषिक प्रांताला १९७१ मध्ये स्वत:ची ओळख मिळाली. हा दक्षिण आशियातला देश आहे. आकाराने खूप लहान असणाऱ्या या देशाच्या सीमा भारत आणि म्यानमारला लागून आहेत. ढाका ही बांग्लादेशची राजधानी. ढाक्याला मशिदींचं शहर असंही म्हटलं जातं. इस्लाम हा बांग्लादेशातला प्रमुख धर्म आहे तर बंगाली ही इथली अधिकृत भाषा आहे. हा जगातला आठव्या क्रमांकाचा तर आशिया खंडातला पाचव्या क्रमांकाचा सर्वात जास्त लोकसंख्येचा देश आहे. इथल्या चलनाला टाका असं म्हटलं जातं. रॉयल बंगाल टायगर हा बांग्लादेशचा राष्ट्रीय प्राणी आहे तर मॅगपाय रॉबिन हा राष्ट्रीय पक्षी आहे. फणस हे बांग्लादेशचं राष्ट्रीय फळ आहे.

या देशाची भूमी सुजलाम सुफलाम आहे. देशात अनेक नद्या आहेत. या नद्या बंगालच्या उपसागराला मिळतात. बंगालचा उपसागर हा जगातला सर्वात मोठा उपसागर आहे. बांग्लादेशात सतत पूर येत असतात. त्यावेळी वाहून येणाऱ्या गाळामुळे इथली जमीन सुपीक बनली आहे. इथले बरेच लोक शेती करतात. जगातल्या तिवरांच्या सर्वात मोठ्या जंगलांपैकी एक जंगल बांग्लादेशात आहे. भात हे इथल्या लोकांचं प्रमुख अन्न आहे. शेती हा इथला प्रमुख व्यवसाय असला तरी कपड्यांची तसंच ज्यूटची निर्यातही मोठ्या प्रमाणावर होते. कापड उद्योग हा इथल्या प्रमुख व्यवसायांपैकी एक आहे.

बांग्लादेशात क्रिकेट खूप लोकप्रिय आहे. कबड्डी हा राष्ट्रीय खेळ आहे. या देशात दोन हजारपेक्षा जास्त मासिकं आणि वर्तमानपत्रं छापली जातात. गंगा, ब्रह्मपुत्रा आणि मेघना या इथल्या प्रमुख नद्या आहेत.



# शॉर्टकट किज तयार करा!

स्मार्ट टिप्स

कॉम्प्युटर किंवा लॅपटॉपचं काम झटपट व्हावं, असं प्रत्येकाला वाटत असतं. या कामी काही शॉर्टकट कीज आपली मदत करू शकतात. एफ ४, आल्ट प्लस शिफ्ट अशा शॉर्ट कीज तुम्ही वापरू शकता. पण दोस्तांनो, लॅपटॉप किंवा कॉम्प्युटरच्या की बोर्डवर तुमच्या आवडीच्या कीजचे शॉर्टकट तयार करता येतात, हे तुम्हाला माहित आहे का? हे नेमकं करायचं तरी कसं? जाणून घेऊ या.

* विंडोज १० च्या माध्यमातून तुम्ही अशा शॉर्टकट कीज बनवू शकता. कोणत्याही प्रोग्रामसाठी कस्टम की बनवण्याचं स्वातंत्र्य तुम्हाला विंडोज १० मुळे मिळू शकतं.
* सर्च बॉक्समध्ये जा. त्यात 'सीएमडी' टाईप करा. कमांड प्रॉम्प्ट विंडो ओपन करा. यानंतर कमांड प्रॉम्प्ट सिलेक्ट करून त्यावर राईट क्लिक करा. आता रन ॲज ॲडमिनिस्ट्रेटर या ऑप्शनवर क्लिक करा.
* Explorer shell : apps folder टाईप करून एंटर दाबा. आता तुम्हाला सिस्टीममध्ये इन्स्टॉल झालेल्या ॲप्सची यादी मिळू शकेल.
* यानंतर ॲपवर राईट क्लिक करा. 'क्रिएट शॉर्टकट' हा ऑप्शन निवडा. यानंतर तुम्हाला डेस्कटॉप शॉर्टकटबद्दल विचारण्यात येईल. 'येस' हा ऑप्शन निवडा.
* आता आयकॉनवर राईट क्लिक करा आणि प्रॉपर्टीज सिलेक्ट करा. शॉर्टकट की फीडमध्ये की कॉम्बिनेशन एंटर करा. कंट्रोल प्लस ऑल्ट प्लस लेटर/नंबर अशा पद्धतीचं कॉम्बिनेशन असायला हवं.

# म्हणून करा व्यायाम!

तंदुरुस्त रहा

मुलांनो, व्यायाम करा, याम करा असं अनेक जण तुम्हाला सांगत असतील. नुसते लोळत पडू नका, स्मार्टफोन बाजूला ठेऊन मैदानी खेळ खेळा असे सल्लेही दिले जात असतील. मग तुम्हीही वैतागून व्यायाम करत असाल. दोस्तांनो, तुम्ही व्यायामाची सवय लावून घ्यायला हवी. व्यायामामुळे आपण तंदुरुस्त रहातो. आपला उत्साह टिकून रहातो. व्यायामाचं महत्त्व लहानपणी नाही तर मोठं झाल्यावर कळतं. व्यायामाचे बरेच फायदे आहेत. त्याविषयी...



* व्यायामामुळे खूप चांगली झोप लागते. काही संशोधनांमधूनही हे समोर आलं आहे. रात्री मस्त झोप झाल्यावर सकाळी ताजंतवानं वाटतं. सगळा दिवस उत्साहात जातो.
* तुम्हालाही अभ्यासाचा खूप ताण असतो. हा ताण कमी करायचा असेल तर व्यायाम करा.
* व्यायामाचा मेंदूलाही लाभ होतो. इतकंच नाही तर स्नायू आणि हाडांनाही बळकटी मिळते. स्मरणशक्ती सुधारते. अभ्यासावर लक्ष केंद्रित करता येतं.
* नियमित व्यायाम केल्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते. मग छोटे छोटे आजार डोकं वर काढत नाहीत.
* व्यायामामुळे रक्ताभिसरण सुधारतं आणि शरीराची क्षमताही वाढते.



# खाली पडलेला पदार्थ खावा का?

हेल्थ वेल्थ

छोट्यांनो, हातातून एखादा पदार्थ खाली पडतो आणि पटकन उचलून आपण तो तोंडात टाकतो. पण तुम्हाला पाच सेकंदांचा नियम माहीत आहे का? खाली पडलेला पदार्थ पाच सेकंदांच्या आत उचलला तरच तो खाण्यायोग्य असतो असं काही तज्ज्ञ सांगतात. पण प्रत्यक्षात असा कोणता नियम आहे का? खाली पडलेला पदार्थ पाच सेकंदांच्या आत उचलून खाल्ल्याने आपल्याला काही त्रास होत नाही का? मित्रांनो, स्वच्छ दिसणारा कोणताही पृष्ठभाग पूर्णपणे स्वच्छ असतोच असं नाही. फरशी कितीही घासून पुसून स्वच्छ केली तरी काही जंतू तसेच राहतात. हे जंतू तुमच्या पोटात जाऊ शकतात.

खाली पडलेला पदार्थ पटकन उचलून खाल्ला तर त्यावर लागलेल्या जंतूंचं प्रमाण कमी असू शकतं. पण पदार्थांवर जंतू लागणारच नाहीत असं नाही. पदार्थ पटकन उचलू तेवढं चांगलं. त्यामुळे तो जास्त वेळ जमिनीवर राहू देऊ नका.

जमिनीवर पडलेला पदार्थ खाणं बऱ्याच अर्थाने घातक ठरु शकतं हे नेहमी लक्षात घ्या. कारण यावरील काही बॅक्टेरियांमुळे आरोग्य धोक्यात येऊ शकतं. काहींमुळे फार त्रास होत नसला तरी काही दुष्परिणाम संभवतात. जमिनीवर पडलेला पदार्थ खाल्ल्यामुळे जुलाब, उलट्यांसारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. खाली पडलेल्या पदार्थावर धूळ किंवा घाण दिसत नसली तरी ते खाल्ल्याने तुम्ही आजारी पडू शकता. जंतू आकाराने इतके छोटे असतात की डोळ्यांना दिसत नाहीत. पदार्थांवरच्या जंतूंचं अस्तित्त्व जाणून घेण्यासाठी तुम्हाला ते प्रयोगशाळेतच पाठवावे लागतात. कोरड्या पदार्थांना कमी जंतू चिकटतात तर ओलसर पदार्थांना मोठ्या संख्येने जंतू चिकटतात हेही लक्षात ठेवा.

# वाढवा संवादकौशल्य!

व्यक्तिमत्त्व विकास

संवादाचं आपल्या आयुष्यात खूप महत्त्वाचं स्थान आहे. संवाद साधण्याचं कौशल्य असेल तर आपण आयुष्यात खूप काही करू शकतो. संवादकौशल्य वाढवण्यासाठी काय करायला हवं याविषयी...



* मुलांनो चांगला संवाद साधण्यासाठी तुम्ही उत्तम श्रोते असणं गरजेचं आहे. तुम्ही इतरांचं बोलणं लक्ष देऊन ऐकायला हवं. पण आपण ऐकण्याकडे नेहमीच दुर्लक्ष करतो. एक चांगला श्रोता प्रश्न विचारतो, इतरांच्या मतस्वातंत्र्याचा आदर करतो. त्यामुळे संवादकौशल्य वाढवण्यासाठी तुम्ही इतरांचं ऐकायला शिका.
* आपलं म्हणणं स्पष्टपणे मांडा. संवाद म्हणजे फक्त बोलणं नाही तर आपलं मत प्रभावीपणे व्यक्त करणं. समोरच्यावर तुमच्या बोलण्याची छाप पडायला हवी. आपल्या गरजांबद्दल मोकळेपणाने बोलायला हवं. मागण्यांबाबत स्पष्ट बोलायला हवं. तरच तुमच्या संवादकौशल्याचा उपयोग होऊ शकतो.
* बोलताना आपला आवाज फार वाढता कामा नये. तावातावाने बोलू नये. यासोबतच आपल्या देहबोलीकडे म्हणजे बॉडी लँग्वेजकडे लक्ष द्यायला हवं. चेहऱ्यावरचे हावभाव, शारीरिक हालचाली यांचा विचार करायला हवा. तुमच्या देहबोलीवरूनही बरंच काही सांगता येतं. देहबोलीतून तुमचा आत्मविश्वास दिसायला हवा. त्यामुळे बोलताना अवघडू नका. हात मोकळे ठेवा. बोलताना थोडं पुढे वाका. समोर बघून बोला.

## ओळखा पाहू...

जिज्ञासा

१) मायक्रोचिप तयार करताना कोणता धातू वापरला जातो?
२) २०१८ ची हॉकी विश्वचषक स्पर्धा भारतातल्या कोणत्या राज्यात रंगली?
३) महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रिसिटी बोर्डाची स्थापना कोणत्या वर्षी झाली?
४) महाराष्ट्रातली सर्वात लांब नदी कोणती?
५) महाराष्ट्राच्या पश्चिमेला कोणता समुद्र आहे?
६) मुंबई हायकोर्टाची स्थापना कोणत्या वर्षी झाली?
७) आफ्रिकेतलं सर्वात मोठं सरोवर कोणतं?
८) सर्वात जास्त लोकसंख्या असलेला आफ्रिकेतला देश कोणता?
९) सांताक्लॉज कोणत्या देशात राहतो?
१०) पांढरा हत्ती कोणत्या देशात आढळतो?

१) सिलिकॉन २) ओडिशा ३) १९६० ४) गोदावरी ५) अरबी समुद्र ६) १८६२ ७) व्हिक्टोरिया सरोवर ८) नायजेरिया ९) फिनलंड १०) थायलंड



# बना स्नो एक्सपर्ट

कोण होणार?

थंडीत काही ठिकाणी बर्फ पडतो. बर्फवृष्टी आणि साचलेला बर्फ बघताना खूप छान वाटतं. तुम्हाला अशी ठिकाणं आवडतात का? बर्फाचा अभ्यास करणं तुम्हाला आवडेल का? या प्रश्नांची उत्तरं होकारार्थी असतील तुम्ही स्नो एक्सपर्ट म्हणून काम करू शकता हे लक्षात घ्या. सरकारी कंपन्या आणि धाडसी खेळांचं, या भागातील टूर्सचं आयोजन करणाऱ्या पर्यटन कंपन्या अशा स्नो तज्ज्ञांना संधी देतात. सध्याच्या काळात धाडसी पर्यटनाचं प्रमाण बरंच वाढलं आहे. लोकांना वेगळी ठिकाणं बघायची आहेत. वेगळे अनुभव घ्यायचे आहेत. त्यामुळे स्नो एक्सपर्टना बऱ्याच संधी उपलब्ध झाल्या आहेत.



स्नो एक्सपर्ट कोणत्या ठिकाणी कशा पद्धतीने बर्फ पडतो, त्याचा निसर्गावर काय परिणाम होतो या बाबींचा अभ्यास करतात. या अभ्यासामुळे हिमस्खलन तसंच इतर नैसर्गिक आपत्तींबाबत अचूक अंदाज बांधणं शक्य होतं. नैसर्गिक आपत्तींमुळे अनेकांचे जीव जातात. पण या आपत्तीबद्दल माहीत असेल तर वेळीच लोकांना सुरक्षित स्थळी हलवता येतं. सध्या ग्लेशियर्स वितळत आहेत. त्यामुळे नदी आणि समुद्राची पातळी वाढत आहे. सहाजिकच नजिकच्या काळात अनेक शहरं पाण्याखाली जाण्याची शक्यता आहे. असं असताना या बदलत्या स्थितीचा अभ्यास होणं आवश्यक आहे. स्नो एक्सपर्ट या कामी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. त्यामुळे तुम्हालाही काही वेगळं करायचं असेल तर स्नो एक्सपर्ट म्हणून कारकिर्द घडवण्याचा पर्याय निवडा. स्नो एक्सपर्टना प्रयोगशाळांमध्येही संधी मिळू शकते. बर्फ पडण्याच्या पद्धतींमध्ये बदल होत आहेत. निसर्गाचं चक्र बदलत आहे. अशा परिस्थितीत या तज्ज्ञांची मागणीही वाढणार आहे.

ठिपके जुळवा



## फोसाविषयी...

दोस्त हे मस्त

मादागास्कारच्या जंगलात फोसा नावाचा प्राणी आढळतो. तो मांजरासारखा दिसत असला आणि मांजराचे बरेच गुणधर्म या प्राण्यात असले तरी तो मुंगुसांच्या कुटुंबातला आहे. फोसा फक्त जंगलातच आढळतो. हा प्राणी दिवसा आणि रात्री दोन्ही वेळेला शिकार करतो.



## मसाला मॅक्रोनी

खादाडी

छोट्यांनो, तुम्हाला मसाला पास्ता आवडतो ना? तर मग हा पदार्थ तुम्ही स्वत:च बनवू शकता. यासाठी दोन कप मॅक्रोनी किंवा पास्ता, बटर, तिखट, मीठ, गरम मसाला, कसुरी मेथी, कोथिंबीर, चिरलेलं गाजर, टोमॅटो, कांदा घ्या. आधी पास्ता किंवा मॅक्रोनी उकडून घ्या. कढईतील तेलात कांदा, टोमॅटो घालून परतून घ्या. तिखट, गरम मसाला, मीठ घाला. पास्ता/मॅक्रोनी घालून हलवून घ्या. वर कोथिंबीर घाला.



## कशावर पिऊ नये दूध?

लाईफस्टाईल


छोट्यांनो, तुम्ही दूध पिता. आरोग्यासाठी दूध उपकारक असतं. पण काही पदार्थ खाल्ल्यानंतर दूध पिऊ नये. यामुळे त्रास होऊ शकतो. जेवणात उडदाची डाळ खाल्ली असेल तर त्यावर दूध पिऊ नये. बरीच मुलं रात्री झोपताना दूध पितात. पण रात्रीच्या जेवणात उडदाच्या डाळीची आमटी असेल तर दूध पिऊ नका. खारट किंवा खारवलेले पदार्थ खाल्ल्यानंतर दूध पिऊ नका. वेफर्स खाल्ल्यानंतर दूध पिणंही घातक ठरू शकतं. दूध पिण्याआधी किंवा त्यानंतर लगेच फळं खाऊ नये.



## महत्त्वपूर्ण मूलाधार चक्र

योगा टाईम

मूलाधार हे शरीरातलं अत्यंत महत्त्वाचं चक्र आहे. या चक्रावर बरंच काही अवलंबून असतं. हे चक्र निष्क्रिय असेल तर अनेक समस्या निर्माण होतात. चक्र नीट कार्य करत नसेल तर खूप आळस येतो. उत्साह वाटत नाही. त्यामुळे मूलाधार चक्र सतत जागृत ठेवायला हवं. यासाठी काही उपाय करावे लागतात. स्थूलपणाही या चक्राच्या निष्क्रियतेला कारणीभूत ठरतो.



# कलासक्त





## जिवंत अभिनयाचा मानबिंदू 'गणपत नायकु पाटील'

**अनेक मराठी चित्रपटांतून तृतीयपंथीयाची भूमिका करणारे नट म्हणून गणपत पाटील मराठी रसिकांच्या ओळखीचे आहेत. लहानपणीच वडिलांचे निधन झाल्यामुळे घरची सर्व जबाबदारी त्यांच्या आईवर पडली. आपली व आपल्या सहा भावंडांची जबाबदारी एकट्या आईवर पडलेली असल्यामुळे गणपत पाटील यांना मोलमजुरी करणे, भाजीपाला विकणे, यांसारखी कामे करावी लागली. गणपत पाटील यांनी उदरनिर्वाहासाठी हलक्या दर्जाची कामे करावयास सुरुवात केली. पण छंद म्हणून त्यांनी अभिनयाची कास सोडली नाही. पारतंत्र्याच्या काळात गणपत पाटील यांनी छुपेपणाने काही कामे केली. पण तेव्हाही त्यांना अभिनयाची ओढ स्वस्थ बसू देत नव्हती. त्यांचा अभिनय पाहून भालजी पेंढारकर यांनी गणपत पाटील यांना 'मीठभाकर' या चित्रपटात खलनायकाची भूमिका दिली. यानंतर त्यांना अनेक चित्रपटातून कामे मिळाली. पुढे चित्रपटसृष्टीत त्यांचे नाव आदराने घेतले जाऊ लागले.**

**श्रीराम शेटये**

कुंदनलाल सहगल, गुरूदत्त, दिलिप कुमार, देवआनंद, राज कपूर, अशा अनेक कलाकारांचे जीवनपट या सदरातून उलगडत असताना आजचे सदर लिहिताना मी स्तब्ध झालो आहे. मानवी जीवन किती अगम्य असावे? नियतीचा खेळ किती भयंकर असवा? या प्रश्नांची उत्तरे माझ्याकडे कधीच असणार नाहीत. पण गणपत पाटील यांच्या हृदयाला भिडणाऱ्या जीवन प्रवाहाचे वर्णन करताना माझी लेखणी चित्कारते. माझ्या हातातली लेखणी बंदूक असती तर समाजातल्या निष्ठूर लोकांना गोळ्याच घातल्या असता. ज्या समाज कंटकानी गणपत पाटील सारख्या कलाकाराचे आयुष्य उद्ध्वस्थ केले. गणपत पाटील करत असलेली 'नाचा' ची भुमिका जनमानसात इतकी रूजली की लोकांनी ठरवूनच टाकलं की गणपत पाटील खरोखरच 'नाचा' आहेत. काहींना वाटलं ते तृतीय पंथीय आहेत. सगळ्यांचा ठाम विश्वास झाला की गणपत पाटील हे पुर्ण पुरूष नाहीत.

परंतू जे गणपत पाटील ज्यांच्या घरात एकेकाळी घमेलाना पैसे मोजले जायचे. ज्यांच्याकडे कोल्हापूरच्या महालक्ष्मी ईस्टेट च्या जमिनीची कोल्हापूरात पेडगावला पाटीलकी होती. ज्या मर्द मराठा गणपत पाटील यांनी आपल्या तरूण वयात भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात स्वतःला झोकून दिले होते. ज्या गणपत पाटलांनी इंग्रज सैनिकांवर स्वातंत्र्य लढ्यात ॲसिड बॉम्ब टाकले होते. इंग्रज सैनिकांच्या गोळ्या झेलल्या होते. अनेकवळा इंग्रज सैनिकांना चकमा दिला होता. हा इतिहास किती लोकांना ठाऊक आहे? जर लोकांना हे ठाऊक असते तर गणपत पाटील यांना 'नाचा' म्हणून हिणवले नसते. पण गणपत पाटील या एका कलाकाराला केवळ आपल्या अभिनयामुळे लोक 'नाचा' समजू लागले.

खर तर गणपत पाटील यांच्या अफलातून अभिनयाला प्रेक्षकांकडून मिळालेली ही दाद होती. अशी दाद जगातल्या कुठल्याही कलाकाराच्या वाट्याला आली नाही. लेखाच्या सुरवातीला मी ज्या मोठ्या कलाकारांची नावे लिहिली आहेत ते मोठे अभिनेते आहेत. परंतू त्यांचा अभिनय पाहिल्यावर ते अभिनय करीत आहेत हे लोकांना माहिती आहे. परंतू गणपत पाटील यांचा 'नाचा' या पात्राचा अभिनय इतका बेमालूम आणि जीवंत अभिनय होता की ते अभिनय करत नसून खरेच 'नाचा' आहेत असे प्रेक्षकांना वाटले.

'नाचा' ची ही भुमिका आणि त्याला मिळालेली दाद ही एकमेव गणपत पाटील यांच्याच वाट्याला आली. अशी जीवंत अभिनयाची दाद जगभरातील दुसऱ्या कुठल्या कलावंताला एखाद्या भुमिकेबद्दल मिळाल्याचे ऐकिवात नाही. परंतू ही दाद दुधारी शस्त्रासारखी होती जितकी वरदान तितकीच शाप ठरली.

दुरदर्शनवर मुलाखतीत आपल्या 'नाचा' च्या या भुमिकेबद्दल बोलताना गणपत पाटील ढसाढसा रडले होते. या भुमिकेने त्यांचे आणि त्यांच्या कुटुंबियांचे आयुष्य पार उद्ध्वस्थ झाले.

त्यांची बायको कुठे समाजात चारचौघात कार्यक्रमाला गेली तर तिच्याशी इतर बायका तुसडेपणाने वागायच्या. नाचाची बायको म्हणून टोमणे मारायच्या. बायकोने आयुष्यभर सोसलेच पण मुलानांही समाजात अत्यंत हिन वागणूक मिळाली. गणपत पाटीलला मुल कशी काय होऊ शकतात? असे लोक म्हणायचे.

मुलांची लग्न ठरवताना खुप अडचणी आल्या. नाच्याची मुले म्हणून हिणवलं गेल त्यांच्याशी लग्न करायला कोणी तयार होईना. आपला समाज किती अंधश्रद्धाळू आणि आडमुठा आहे हे आपल्या लक्षात येईल. निवृती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई या भावंडाना जिथे संन्याशाची मुले म्हणून हिणवले गेले तिथे गणपत पाटलांची काय कथा? गणपत पाटील यांच्यावरही आत्महत्या करण्याची वेळ आली होती. तसा त्यांनी प्रयत्नही केला होता.

आता हे सर्व जाणून घेण्यासाठी आपण गणपत पाटील यांच्या जीवन प्रवाहाकडे वळूया. गणपत पाटील यांच्या वडिलांकडे कोल्हापूरच्या महालक्ष्मी ईस्टेट च्या जमिनीची पाटीलकी होती. भाऊबंदकीमध्ये झालेल्या वादांमुळे गणपत पाटलांच्या वडिलांनी कोल्हापूरातील पेडगावचे घर सोडले आणि कोल्हापुरात स्थलांतर केले.

कोल्हापूरात आल्यावर काही काळ नोकरी केली. नंतर त्यांनी कोल्हापुरात पापाची तिकटी येथे सोडा वॉटर चे दुकान सुरू केले. अख्ख्या कोल्हापुरात ते सोडा वॉटर चे पहिले दुकान. जोरात चालायचे एक दोन आण्याच्या नाण्यांनी एक घमेल भरायचे. वडील ते पैसे एक एक करून मोजण्या ऐवजी वेळेस असावी मुठी जमुठी ने मोजत. त्या काळातले एक दोन आणे म्हणजे आजच्या काळात त्याची किंमत जास्त होईल. नायकु सोडावाला म्हणून ते कोल्हापूरात प्रसिद्ध होते. त्यांनी अनेकांना उसने पैसे दिले होते. एका मित्राला दिलेले उसने पैसे परत मागितले म्हणून त्या मित्राने दारूतून त्यांना विष पाजले त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

डोक्यावरून वडीलांचे छत्र हरपले आणि घरदार व दुकानही गेले. गरीबीचे दिवस आले. गणपत पाटील यांना शिक्षणात फारसा रस नव्हता त्यांनी सहावी नंतर शाळा सोडली व छोटी मोठी कामे केली. डोक्यावर पेटी घेऊन गल्लो गल्लीत पावही विकले.

कलेची आवड त्यांना होतीच. वयाच्या चौदा-पंधराव्या वर्षी तोंडाला रंग लावला तो कायमचाच. कोल्हापूरात तेव्हा रामायणाचे खेळ चालायचे त्यात त्यांनी सीतेची भुमिका केली. खोत मास्तर या नाटकाची आवड असणाऱ्या शिक्षकांशी त्यांचा संपर्क झाला. त्यांनी 'दोन वेण्यांची कॉलेज कुमारी' हे नाटक बसविले होते. त्यात 'कॉलेज कुमारी' ही या नाटकात त्यांनी स्त्री भुमिका केली होती. या नाटकाच्या प्रयोगाच्या प्रसिद्धीसाठी यातील सर्व कलाकारांनी मेकअप व वेशभूषा करून फोटो स्टुडिओत फोटो काढायचे ठरले. गणपत पाटील यांनी स्त्रिवेश धारण केला आणि मुद्दामच सर्वांची गम्मत करण्यासाठी लाजत मुरडत कोल्हापुरातील बिंदू चौकात बराले फोटो स्टुडिओत आले. सहकलाकारांपैकी त्यांना कोणीच ओळखले नाही. खरी सुरूवात इथूनच झाली. लाजणे, मुरडणे, बायकी आवाजात बोलणे त्यांच्या अंगवळणी पडले.

सन १९४२ मध्ये देशभर स्वातंत्र्य चळवळ अंतिम टप्प्याला आली होती. १९४२ च्या उठावात अनेक तरूण तरूणी स्वातंत्र्य लढ्यात सामील झाले होते. कोल्हापूरात अनेक क्रांतिकारकांचे इंग्रज सैनिकांवर बेछूट हल्ले करीत होते. तालमीतले लोक त्यात सामील झाले. त्यावेळचे प्रसिद्ध पेहलवान बाबुराव महाडिक त्यांचे म्होरके होते. बाबुराव महाडिक यांच्या बरोबर गणपत पाटील सारखे अनेक युवक स्वातंत्र्य लढ्यात उतरले होते. बाबुराव महाडिक यांना बॉम्ब बनविण्याची कला अवगत होती. गणपत पाटील आणि त्यांचे चार पाच सहकारी बाबुराव महाडिक यांच्या घरातील तयार असलेले बॉम्ब घेऊन जात असत. हे सगळेजण इंग्रज घोडदळाची वाट बघत गल्ली बोळात दबा धरून बसत. इंग्रज घोडेस्वार आला रे आला की त्याच्यावर बॉम्ब वर्षाव करीत असत. गणपत पाटील हातात ॲसिड बॉम्ब घेऊन इंग्रज सैनिकांवर फेकून गनिमी काव्याने पसार होत असत. घोडेस्वार अरूंद गल्लीत शिरू शकत नसल्याने इंग्रज सैनिकांना पाठलाग करणे अवघड होई. त्यांनी अनेकवळा इंग्रज सैनिकांना चकमा दिला. काही वेळा इंग्रज सैनिकांच्या गोळ्यांचा वर्षाव होत असताना त्यातून निसटले. एकदा तर त्यांच्या सोबतच्या मित्राला इंग्रज सैनिकांनी पकडले व संगीनीने भोकसून मारले. गणपत पाटील इंग्रज सैनिकांच्या तावडीतून थोडक्यांत वाचले.

आपले वडील आधीच वारलेले आहेत. आई कष्ट करून मुलांना सांभाळत आहे. आपल्या मृत्यूने आईला अतीव दुःख होईल यांची जाणीव गणपत पाटील यांना होती म्हणूनच त्यांनी या लढ्यात स्वतःला सुरक्षित ठेवले. फार अतिरेक केला नाही.पुन्हा आपल्या आवडत्या अभिनय क्षेत्रात प्रयत्न सुरू केले. राजा गोसावी यांच्याशी ओळख झाल्यावर ते मास्टर विनायक यांच्या शालिनी सिनेटोनमध्ये दाखल झाले. त्याच सुमारास राजा परांजपे दिग्दर्शित 'बलिदान' व राम गबालेंच्या 'वंदे मातरम' चित्रपटात त्यांना संधी मिळाली. 'बलिदान' (१९४८), वंदे मातरम (१९४८), मिठ भाकर (१९४९), राम राम पाव्हणं (१९५०), पाटलाचा पोर (१९५१), 'गाठ पडली ठका' (१९५६), थोरातांची कमळा (१९६३), सोंगाड्या (१९७१), कलावंतीन (१९७८), बोला दाजीबा (१९८७) आणि अगदि मृत्युच्या दोन वर्षापूर्वी 'मुख्यमंत्री गणप्या गावडे (२००६)' हा त्यांचा शेवटचा चित्रपट.

हे गणपत पाटील यांचे काही प्रमुख चित्रपट आहेत. कृष्णा पाटील यांच्या 'वाघ्या मुरळी' चित्रपटात त्यांनी केलेली नाचाची भुमिका खुप गाजली. त्यांच ते कमरेवर हात ठेऊन लचकत मुरडत चालणं गालावर बोट ठेऊन ''आता ग बया'' अस बायकी आवाजात बोलणं या सगळ्याला प्रेक्षकांची प्रचंड साथ मिळाली. मग पुढची सगळी वर्षे गणपत पाटील नावाचा नाचा मराठी चित्रपट सृष्टीवर राज्य करून गेला. जयश्री गडकर, आशा काळे, मधू कांबीकर यांच्यासारख्या सगळ्याच अभिनेत्री आपल्या तमाशाप्रधान चित्रपटात गणपत पाटील असावेत असा आग्रह निर्मात्यांकडे धरत असत. नाचाचा हा एक असा जीवंत अभिनय जो जनमानसात खराखुरा वाटला. गणपत पाटील यांनी हे पात्र मराठी चित्रपटांत अजरामर केले. त्यांच्या या योगदानाबद्दल मराठी चित्रपटसृष्टी कायम ऋणी राहिल. **

## बाल्या नृत्याला सुगीचे दिवस

**प्रमोद जाधव**









कोकण प्रांतातून उगम पावणाऱ्या जाखडी तथा बाल्या नृत्याला रायगड जिल्ह्याात मोठ्या प्रमाणात महत्व प्राप्त झाले आहे. विशिष्ट वयोगटातील मंडळी असलेल्या या कलेमध्ये आता तरुणाईदेखील रमू लागली आहे. संगणकाच्या युगातही ही लोककला टीकून आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने जिल्ह्यातील अनेक भागात नाचांची घुंगरे निनादू लागली आहेत. गणेशोत्सवात या नृत्याला मागणी वाढली आहे. त्यामुळे या नृत्याला सुगीचे दिवस आल्याचे दिसून येत आहे.

श्रावण महिना उजाडला की, आदिवासीवाड्यांसह काही गावांमधून शक्ती तुऱ्यांच्या नाचाचे रंग भरू लागतात. घुंगराचे ढोलकीचे आवाज निनादू लागतात. नारळी पौर्णिमेपासून या मंडळाच्या उभारणीला जोमाने सुरुवात होते. अलिबाग तालुक्यात दक्षिण विभागात महाजने, सुडकोली, भागवाडी, गंगेचीवाडी, दिवीवाडी, आग्राव, बापळे, आदी ठिकाणी अनेक वर्ष या नाचाची परंपरा सुरू आहे. महाजने गावात श्रमिक नाच मंडळाने ५० वर्षाची परंपरा जपली आहे. रोहा तालुक्यातील देवकान्हे, यशवंतखार, धोंडखार, पाले अशा अनेक गावात ही परंपरा आजही सुरु आहे. पुराणापासून ते आताच्या चालू घडामोडींवर गाणी असतात. आताच्या घडीचे प्रसिध्द कवि प्रविण शेळके, गायक व कवी वसंत भोईर, शंकर जाधव, गायक सुनील झावरे, विनायक भोनकर, अरुण रसाळ, दत्ताबुवा कुंभार, महेंद्र औचटकर, सचिन पारंगे अशा अनेक गायकांनी नाचांचे सामने गाजवले आहेत.

बाल्या नृत्याकडे पुर्वी मनोरंजन म्हणून पाहिले जात होते. गावातील ३० ते ५० वयोगटातील मंडळी एकत्र येऊन महाभारत, रामायणाच्या कथा कलेच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचवत होते. हळूहळू या कलेचा विस्तार वाढू लागला आहे. तळ कोकणातून पोलादपूर, महाड, रोहा या दक्षिण रायगडमध्ये बाल्या नृत्य सुरू झाले. १९ व्या शतकात सुरु झालेली ही कला रायगड जिल्ह्यात शहरी भागासह ग्रामीण भागातदेखील वाढू लागली. बाल्या नाचाला कलगीतुरा किंवा शक्ती-तुरा सामना असेही म्हटले जाते. बाल्या नृत्यप्रकारात गायक, दोन ढोलकी वादक, झांजरीवादक व गायकांना साथ देणारे एक-दोन जण मंडळी असतात. ते सर्वजण मध्यभागी बसतात. त्यानंतर आठ ते दहा जण भरजरी कपडे व पायात चाळ बांधून पायांच्या विशिष्ट हालचालींवर त्यांच्या सभोवती गोलाकार नृत्य करतात. गण, गौळण, भक्तीपर, सामाजिक तसेच सद्य परिस्थितीवर आधारित माहितीपर गाणी गायले जाते. हुंडाबळी, स्त्री भ्रुण हत्या, दारु व्यसन अशा अनेक विषयांवर गाणी गाऊन समाज प्रबोधनाचे काम बाल्या नृत्याच्या माध्यमातून केले जात होते. नृत्यामध्ये सवाल-जवाब स्वरूपाचीही गाणी गायली जातात. नैसर्गिक आपत्ती, तसेच समाजातील विविध समस्यांवर गीते रचतात. नृत्याच्या वेळी ती गीते गायली जातात. राधाकृष्णावर विशेष करून गाणी रचली जातात. तुरेवाले सवाल विचारतात. शक्तीवाले त्यांच्या काव्यातून त्यांना उत्तर देतात. परंतु संगणकीय व मोबाईलच्या जगतामध्ये २००५ नंतर ही कला लोप पावली होती. परंतु अलिबागसह रोहा, मुरूड तालुक्यातील अनेक गावांमधील मंडळींनी ही कला टीकून ठेवण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. या कलेला आधुनिकतेची जोड देत बदलत्या काळानुसार या कलेमध्ये काही प्रमाणात बदल करण्यात आला. पायात बुट, टी शर्ट, गळ्यात मफलर, टोपी अशा अनेक स्वरुपाचे बदल करून ही कला आधुनिक करण्याचा प्रयत्न केला. बाल्या नृत्य प्रकार संगणकाच्या युगात आजही गावागावात ज्येष्ठ मंडळींसह तरुणांच्या मनामनात रुजल्याचे चित्र आहे. आज अनेक गावांतील शाळकरी मुलांसह महाविद्यालयातील तरुण मंडळी या नृत्यामध्ये आवडीने सहभाग घेऊन त्याचा आनंद लुटत आहेत.

गणेशोत्सवाच्या काळात जाखडी नृत्य व परंपरेला मोलाचे स्थान आहे. गणेशोत्सवामध्ये ग्रामीण व शहरी भागात बाल्या नृत्याचे सादरीकरण केले जाते.


गणरायाचे आगमन सात सप्टेंबरला होणार आहे. या कालावधीत वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम भरविले जाणार आहेत. त्यामध्ये बाल्या नृत्याचे सादरीकरणदेखील मंडळाच्या मार्फत आयोजित केले जाणार आहेत. त्यामुळे गणेशोत्सवात जिल्ह्यातील अनेक भागात जाखडी अथवा बाल्या नृत्याचे सादरीकरण पहावयास मिळणार आहे. वेगवेगळ्या नाच मंडळाकडून सराव केला जात असून त्याची सुरुवातही गोविंदापासून करण्यात आली आहे. त्यामुळे या धावपळीच्या युगात पारंपारिक लोककलेचा आनंद नागरिकांना घेता येणार आहे. **

## कान्हा राजा

**'कृष्णगान'**

**शशिकांत मुद्देबिहाळकर**

**९७६७१५२६०८**




कवीने कृष्णाची यापूर्वी बालक, खेळगडी, मित्र, प्रेयसी, प्रियकर, आई, पिता, सेवक, ही रुपे आपल्या कवितांमधून सुंदर वर्णन केली आहेत. प्रस्तुत कवितेत कवीने कान्ह्याचे ''राजा'' या रुपाचे वर्णन केले आहे. तसा हा राजा म्हटलं तर सामान्य, म्हटलं तर त्याचे असामान्यत्वही आपल्याला दिसून येते.

कसे ते पहा. हा राजा. कोणतीही कृती न करता सदैव नूसता बसून रहातो. जगात अनागोंदी माजली तरी त्याच्या मनाला त्याची पर्वाच नाही. असेच दिवस, मास, एवढेच काय, वर्षेही निघून जात आहेत. तो नुसता पुढे पहात बसतो पण कोणतीही कृती मात्र करीत नाही. जिंकण्याची त्याला आशाच नाही, त्यामुळेच तो शत्रूवर कसा विजय, मिळविणार असा प्रश्न पडला तर त्यात नवल ते कुठले? सैनिकांना जमविणे, त्यांना युद्धासाठी तयार करणे वगैरे गोष्टीत त्याला रस नाही. कदाचित त्याला तुम्ही भित्राही म्हणाल पण त्याचीही त्याला पर्वा नाही. त्याचेवर शत्रू राक्षस चालून आले तरी तो त्यांचीच खुषमस्करी करून त्यांचे लाड वगैरे करतो. नूसता वन वनांतरी सुंदर रमणींसोबत रास क्रीडा करीत बसतो. नभातून वर्षणाऱ्या वर्षा अभावी जमिनीवरील पिके करपून जात आहेत, प्राणीमात्र तहानेने व्याकूळ झाले आहेत, अशा स्थितीतही हा राजा रमा रमणींसंगे मुखाने सुरेल बांसरी वाजवीत बसतो. त्याला विनम्र होऊन पदस्पर्श करून याचना केली तरी तूमच्या, विधीलिखित आहे जे धर्म, अर्थ, काम, मोक्ष, त्यापैकीच होणार असे काहीतरी गुढ बोलतो.

तरीही कवी म्हणतो आमचा त्याचेवर पूर्ण विश्वास आहे. आमची संकटे तोच निवारणार आहे. आम्ही त्याची विनवणी केल्यानंतर तो निघून जातो कुठेतरी, लपून बसतो, त्याचीही त्याला लज्जा नाही. नंतर मग वेळप्रसंगी तो मंत्र, तंत्राने शत्रूला वश करतो, त्याचे शौर्यही दाखवितो. बलशाली असा जणू दिसतो, क्षणात हलाहल असे भयंकर रूप धारण करतो, त्यामुळे जणू अखिल विश्व थरारून ऊठते. क्षणार्धातच वैर निपटून काढतो, शत्रूला भस्मसात करतो, दुःखितांचे दुःखाचा निःपात करतो, हाती सुदर्शन चक्र घेतले की धर्म स्थापनाय समग्र वैर क्षणार्धातच विध्वंस करून टाकतो. हे सर्व पाहिल्यावर, गाणी रचून राजा कान्ह्याची स्तुती कवी करतो. ऊचच रवाने अनंत काळासाठी त्याची कीर्ती गायिली जाते. कवी म्हणतो मी तर माझ्या पोटाची सोय करायला इथे आलो होतो, पण माझा गौरव करून राजाने मला मंत्रीपद दिले, मला अपार वैभव दिले, मला शिक्षण नसूनही वेदांचे बहूमोल ज्ञान दिले. या कान्हा राजाचे नामध्येय जगी गाजत राहो, दिनांचे दैन्य या विश्वातून निघून जावो, इथे शांती किर्ती नांदो, दुःखाचा नाश होवो, हेच आशिर्वाद कान्हा राजाचे लाभत राहोत, अशी या कान्हा राजाचे गुणवर्णन करून कवीने ही कविता संपन्न केली आहे. कान्हा राजा म्हणून कधी अहंकाराला स्पर्श करीत नाही. तटस्थ राहून परिस्थितीचे अवलोकन करतो. आपण दुबळे असल्याचे दर्शविते, वेळ येताच त्याचे देवत्व धर्म रक्षणाय सिद्ध होते. दुःखितांचे दुःख दूर करून तो शांतीदूत ठरतो. अर्थात त्याचे विरश्रीचे रूपही कवीने कवितेत सुंदर वर्णन केले आहे. इथे कविता संपन्न होते.

**(कवी प्रा. श्रीप्रकाश अधिकारी)**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)